# पेरकी समाज

## माहिती, इतिहास आणि जनजागृती !

www.Perki.in

# विवाह विशेषांक



**‘समाजात विवाह करा ! समाजाला संघटित ठेवा !’**

**‘समाजाचे खरे समाजसेवक बना ! !’**


• संकलनकर्ता •

**प्रकाश पारो गणपतराव गोविंदवार**

ॲडमिन - पेरकी समाज बिजनेस ग्रुप


www.climatecooler.in

# सिंगतवार परिवार

। पवित्र तुमची स्मृती, अनंत तुमची माया ।। नित्य असुद्या आम्हावरती, अखंड तुमची छाया ।



कै. श्रीमती सरूबाई गोपाळराव सिंगतवार



कै. श्री गोपाळराव सोमाजी सिंगतवार

सहवास जरी सुटला, स्मृती सुगंध देत राहील.
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आठवण तुमची येत राहील.

## श्रीमती सरूबाई गोपाळरावजी सिंगतवार सहज परिचय

मोहन नगर नागपूर निवास सरूबाई सिंगतवार एक साहसी और कर्तृत्ववान महिला के रूप में जानी जाती थीं। उनके पती श्री गोपाळरावजी सिंगतवार बहुत ही शांत और सरल स्वभाव के धनी थे। साहस और दृढ स्वभाव के कारण घर की निर्णय प्रक्रियाओं व्यावहारिक और सामाजिक तौरपर सरूबाई कि अहम भूमिका रहा करती थी । उनके घर में उनके पती गोपाळरावजी उनके बड़े पुत्र श्री रामचंद्रजी उनके छोटे पुत्र श्री प्रभुजी ये सरकारी नोकरी में कार्यरत थे व श्रीमती सरूबाई का सारा का व्यवहार का ... था । संयुक्त परिवार होनेसे घर के सभी कुटुंबसंबंध कार्यमें सम्मीलन ... था । घर जिम्मेदारी करने के निर्णय में अहम भूमिका श्रीमती सरूबाई की रहा करती थी । मोहन नगर इलाका काफी छोटे समाज के मुकाबले ... करते चाहते थे। वे सभी लोग सरूबाई का आदरपूर्वक सम्मान करते थे। जिस समय आस-पास के गावों या जिल्हों में रिश्तेदारी हुआ करती थी। उस समय उन्होंने नागपूर से बहुत दूर गोंदिया में दो बुद्धी-संपन्न परिवार में अपने लड़की का ब्याह रचाया। जो की उस समय एक साहसिक कदम था ।

नागपूर-गोंदिया उस समय काफा रिश्ता होने के नाते जितने भी गोंदिया वाले समाज प्रेमी नागपूर अस्पताल, दवाखाना या अपने निजी काम के लिए नागपूर आते थे तो सरूबाई सिंगतवार इन्हीं के घर पे आते थे। सरूबाई सिंगतवार का निवास उस समय गोंदियावाली समाज भाईयों के लिए मानो एक प्रकार का अतिथी गृह ही बन गया था। और उन्होंने भी उन सभी समाज भाईयों का बड़ी विनम्रता के साथ आदरातीथ्य निभाया। इसीलिये वे काफी लोग उनके यहाँ बेझिझक आना-जाना करते थे ।

सरूबाई सिंगतवार जैसी कर्तव्यदक्ष, साहसी और सक्षम महिला को उनके साहस, उदारता और समाजप्रति सद्भाव के लिए जरूर याद किया जाना चाहिये। उन्होंने अपने विचारोंसे, जो मजबूत नींव रखी थी, उन्हींसे प्रेरणा पाकर उनका सारा परिवार उसी मजबूती और दृढता के साथ अपना मार्गक्रमण करता दिख रहा है।

## कै. श्रीमती सरूबाई गोपाळरावजी सिंगतवार का परिवार



# भारताचे संविधान

## उद्देशिका

**आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य** घडवण्याचा
व त्याच्या सर्व नागरिकांस :
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय** ;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य** ;
दर्जाची व संधीची **समानता** ;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून ;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर, १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर




# शहीदों की चिताओं पर लगेंगे हर बरस मेले,
# वतन पर मरने वालों का यही बाकी निशां होगा

**मानव जन्मात दोन प्रकारचे लोक येतात.**
**काहीं चांगलें करून नावे करतात. लोक त्यांना आठवतात.**

**दुसरे, अज्ञाताच्या अंधारात असंख्य लोक मरतात.**
**तुम्ही करोडपती, अब्जाधीश किंवा पदाअधिकारी ,**
**नेता असलात तरीही रस्त्यावरचा कुत्राही तुम्हाला ओळखत नाही.**






मानव जन्मात दोन प्रकारचे लोक येतात. खूप नावे कमवतात. चागलें काम करतात. लोक त्याला आठवतात. त्यापैकीच एक म्हणजे पांढरकवडा येथील अमर हुतात्मा नागेश्वर विठ्ठलराव जिद्देवार. जो सीमेवर गोळया खावून देशासाठी शहीद झाला.

त्याच पांढरकवडा स्मशानभूमीत त्यांचे छोटेसे पण सुंदर स्मारक बांधले आहे. ज्या ठिकाणी त्यांचे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचा जन्म 1967 मध्ये झाला आणि 24/1/1992 रोजी मृत्यू झाला. आज तो जिवंत असता तर तो माझ्या वयाचा, 57 वर्षांचा असता. 32 वर्षांपूर्वी देशसेवेत ते शहीद झाले. त्यांचे दुसरे स्मारकही पंचायत भवनात बांधले आहे. खुल्या सभागृहाला अमर शहीद नागेश्वर विठ्ठलराव जिद्देवार यांचे नाव देण्यात आले आहे.

**पेरकी समाजाच्या दोन्ही लोकांचे स्मारक होण्याचे कारण देखील पदाधिकारी आणि समाज सेवक श्री मदन जी जिडेवार यांच्या काळात समाजाच्या संघटित प्रयत्नांमुळे आहे. त्यामुळे हुतात्मा नागेश्वर विठ्ठलराव जिद्देवार यांचे स्मारक बांधण्यात आले. त्यामुळे पेरकी समाजाने एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे.**

**पेरकी समाज बिजनेस ग्रुप देश के सभी शहिदों को अभिवादन करता है।**

**विनम्र आदरांजली अर्पित करता है**

www.Perki.in

# पेरकी समाज

माहिती, इतिहास आणि जनजागृती !


प्रकाशक
**पेरकी समाज उद्योजिका प्रकाशन**
प्लॉट नं. 96, मिलींद नगर,
बालाभाऊपेठ, नागपूर - 440017.



संकलनकर्ता
**प्रकाश पारो गणपतराव गोविंदवार**
प्लॉट नं. 96, मिलींद नगर,
बालाभाऊपेठ, नागपूर - 440017.
मो. 9096170712



तृतीय आवृत्ती
3000 प्रतियां
26 अक्तूबर 2025

मुद्रक
**पंचशील ग्राफीक्स**
137, मिलींद नगर, बालाभाऊपेठ,
नागपूर - 17. मो. 9822728026

किंमत
**रूपये 100/-**



व्यक्तिगत वितरण के लिये
संपादकीय अधिकार सुरक्षित है।


## अनुक्रमणिका


प्रकरण 1 : संपादकीय प्रस्तावना ........... 5

प्रकरण 2 : विवाह एक संस्कार आहे ! पेरकी समाजाच्या 'संस्कारा'चे जतन करा ! ................ 8

प्रकरण 3 : झाडीपट्टीतील पेरकी समाजः निसर्गरम्य भूमीतील परंपरा आणि विवाह विधी ! ......... 11

प्रकरण 4 : हुंडा एक सामाजिक समस्या व उपाय योजना ..... 13

प्रकरण 5 : शोध पेरकी समाजात पुनर्विवाहाचा ! आजची वर्तमान परिस्थिती !... 15

प्रकरण 6 : पेरकी समाजात हल्ली विवाह जुळवण्यासाठी कोणी मदत करत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे!.. 18

प्रकरण 7 : पांढरकवड्यातील पेरकी जनसंघम संगठन चे पहिल्या सामूहिक विवाह युगप्रवर्तक सोहळा ! ............ 19

प्रकरण 8 : 250 रुपयांचे 'नोंदणीकृत लग्न' आणि चार पुरुषार्थ ! ........... 21

प्रकरण 9 : अंतरजातीय विवाह समाजाला एक शाप ! ..................... 23

प्रकरण 10 : वेडिंग प्लानरच्या मदतीने बजेटमध्ये लग्न कसे करावे ! .. 24

प्रकरण 11 : लग्नाआधी रक्त तपासणी का आवश्यक आहे ............ 25

www.Perki.in

# पेरकी समाज

माहिती, इतिहास आणि जनजागृती !


प्रकाशक
**पेरकी समाज उद्योजिका प्रकाशन**
प्लॉट नं. 96, मिलींद नगर,
बालाभाऊपेठ, नागपूर - 440017.



संकलनकर्ता
**प्रकाश पारो गणपतराव गोविंदवार**
प्लॉट नं. 96, मिलींद नगर,
बालाभाऊपेठ, नागपूर - 440017.
मो. 9096170712



तृतीय आवृत्ती
3000 प्रतियां
26 अक्तूबर 2025

मुद्रक
**पंचशील ग्राफीक्स**
137, मिलींद नगर, बालाभाऊपेठ,
नागपूर - 17. मो. 9822728026

किंमत
**रूपये 100/-**



व्यक्तिगत वितरण के लिये
संपादकीय अधिकार सुरक्षित है।


## अनुक्रमणिका


प्रकरण 12 : लग्नाआधी वधू-वरांनी एकमेकांना जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे! . 27

प्रकरण 13 : घर-संसार आणि परिवार ! हे त्याग, बलिदान आणि आत्म-विकासाची गाथा आहे भारतीय संस्कृतीत ! .. 28

प्रकरण 14 : सून नव्हे ! आमची लेकच ! लावून दिला पुनर्विवाह ! .......... 29

प्रकरण 15 : प्रेम विवाहाला समर्थन द्यावे की नाही ? ........................ 31

प्रकरण 16 : विवाहमार्गावरील आकर्षकता आणि आत्मविश्वास ! सौंदर्य सुधारणेची गरज आहे का ? .................. 37

प्रकरण 17 : लग्नाचे स्वप्न आणि शेतकरी तरुणांचे वास्तव! जिथे नाती जुळत नाहीत! .. 38

प्रकरण 18 : पेरकी समाज ! ओळख, अस्तित्व आणि 'समाजात लग्न करा' अभियानाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे ...... 41


प्रकरण 19 : हिंदू धर्मात विवाह (गृहस्थाश्रम) का आहे अनिवार्य ? सनातन वैदिक मूल्यांचे प्रबोधन ! ................. 43

प्रकरण 20 : विवाह : प्रेम आणि विश्वासाचा मजबूत पाया आहे ! .............. 45

प्रकरण 21 : घटस्फोटाच्या परिस्थितीत स्त्री आणि पुरुषांचे अधिकार आणि न्यायालयांची भूमिका ! ............ 47

# प्रस्तावना

प्रिय पेरकी बंधूंनो, नमस्कार!





या वर्षीच्या पेरकी समाज पत्रिका 2025-26 चा मुख्य विषय विवाह (लग्न) हा आहे. या आधी दोन पेरकी समाज पत्रिका प्रकाशित झाले आहे.

पेरकी समाज मूळतः तेलुगू भाषी असला तरी महाराष्ट्रात राहणारे लोक मराठी व हिंदी भाषांमध्येही पारंगत आहेत. पेरकी समाजाची स्वतःची अशी संस्कृती, धार्मिक परंपरा आणि स्वतंत्र सांस्कृतिक ओळख आहे. या पत्रिकेचा उद्देश पेरकी समाजाचे रीतीरिवाज आणि संस्कृती लोकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

**समाजातर्गत विवाहाचे महत्त्व !**

कोणताही भारतीय समाज विवाह व्यवस्थेमुळे एकत्र बांधलेला आहे. 'रोटी-बेटी'चा व्यवहार समाजाला एका सूत्रात बांधून ठेवतो. समाजातर्गत विवाहामुळे नातेसंबंध वाढतात आणि समाजाची लोकसंख्या वाढते. समाजात लग्न करणे हे समाजाला जोडण्याचे काम आहे, तर समाजात लग्न न करणे हे समाजाला तोडण्यासारखे आहे. कोणताही समाज हा समविचारी लोकांचा समूह असतो आणि त्याची पायाभरणी समाजातर्गत विवाहांद्वारेच केली जाते.

**आंतरजातीय विवाहावरील विचार !**




समाजाबाहेर जाऊन लग्न करण्याचे संविधानिक स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे आणि हा त्यांचा वैयक्तिक निणऱ्य आहे. संविधान याला परवानगी देते. या निणऱ्यात आई-वडील, समाज किंवा अन्य कोणालाही हस्तक्षेप करण्याचा अधिकार नाही.

मात्र, आंतरजातीय विवाह करणाऱ्या लोकांनी समाजाने आदर-सत्कार करावा किंवा समाजात पद-प्रतिष्ठा द्यावी, अशी अपेक्षा ठेवू नये.

त्यांचा वैयक्तिक निणऱ्य इथे संपतो आणि समाजकारण सुरू होते. आंतरजातीय विवाह करणाऱ्या व्यक्तींना किंवा त्यांच्या

कुटुंबियांना समाजात पदाधिकारी म्हणून सन्मानित करणे, हे समाजाने स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे आहे. हे समाजात आंतरजातीय विवाहांचे प्रोत्साहन करण्यासारखे आहे.

लेखक म्हणून, माझ्या जवळच्या नातेवाईकांमध्ये आंतरजातीय विवाह झाले आहेत, त्यामुळे मी समाजात पद-प्रतिष्ठा मिळवण्याचा अधिकार किंवा समाजाच्या निवडणुका लढवण्याचा अधिकार ठेवत नाही. मी समाजाच्या निवडणूक-राजकारणापासून दूर राहून केवळ साहित्याच्या माध्यमातून समाजाच्या हितासाठी जनजागृती वाढवण्याचे काम करत राहीन.

समाजाच्या हितासाठी काम करणे हा माझा जन्मसिद्ध अधिकार, कर्तव्य आणि जबाबदारीही मी मानतो. हा अधिकार माझ्याकडून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, जो अविरतपणे सुरू राहील. ज्यात मला साहित्याच्या माध्यमातून समाजात जनजागृती वाढविण्यात योगदान द्यायचे आहे.

काही विशेष परिस्थितीत मी आंतरजातीय विवाहांचा समर्थक आहे. पेरकी समाजात योग्य मुलगा उपलब्ध नसताना, मी वैयक्तिक स्तरावर दोन मोठ्या वयाच्या युवतींचे आंतरजातीय विवाह जुळवण्याचे प्रयत्न केले होते. यापैकी एका मुलीने समाजातच लग्न केले, तर दुसरी अविवाहित राहण्याचा निश्चय करून राहिली.

**सामाजिक नियम आणि समस्या !**

शतकानुशतके समाजाचा एकच नियम आहेः 'कायद्यात राहाल, तर फायद्यात राहाल.' समाजाचा कायदा हा आहे की, समाजात राहायचे असेल, तर समाजातच लग्न करा. समाजाबाहेर लग्न केलेल्या लोकांची समाजाला गरज नाही आणि त्यांनाही समाजाची गरज नाही. त्यांनी खुशाल समाजविहीन होऊन जगावे.

विवाह हा व्यक्तीविशेष आणि कुटुंबविशेष यांचा अधिकार, कर्तव्य, जबाबदारी आणि स्वातंत्र्याशी जोडलेला प्रश्न आहे. संविधान प्रत्येकाला आपल्या मर्जीनुसार विवाह करण्याची स्वतंत्रता देते. दुसरीकडे, समाज प्रत्येक कुटुंबाला समाजात राहून लग्न करण्यासाठी प्रोत्साहित करतो, जेणेकरून समाजाची संख्यात्मक सकारात्मक शक्ती वाढेल.

आंतरजातीय विवाह करण्यामागे प्रेमसंबंधांची मजबुरी, हुंडाप्रथा आणि गरिबीसारख्या काही मजबुरी असतात. आंतरजातीय विवाह हा कुटुंबांनी समाजातला मान गमावण्याच्या किमतीवर केलेला शेवटचा पर्याय असतो.

### घटस्फोट आणि घटते लिंग गुणोत्तर !

पेरकी समाजात आंतरजातीय विवाह केलेल्या मुलींच्या घटस्फोटाचे प्रमाण खूप वाढले आहे. अशा घटस्फोटित तरुण मुलींचा पुनर्विवाह समाजात किंवा समाजाबाहेरही होत नाहीये. घटस्फोटित तरुणांची संख्या पुरेशी असूनही ही परिस्थिती आहे. आंतरजातीय विवाहानंतर युवक आणि युवतींच्या घटस्फोटाच्या घटना तीव्र गतीने वाढत आहेत, ही चिंतेची बाब आहे.

तसेच समाजातर्गत विवाहांमध्ये घटस्फोटाचे प्रमाण खूप कमी आहे. आंतरजातीय विवाहांमध्ये जिथे समाजाची जातगत ओळख गमावण्याची भीती आहे, तिथे घटस्फोटित लोकही सर्वाधिक आहेत. समाजातील ज्येष्ठ बंधूंनी या गंभीर समस्येकडे लक्ष दिले पाहिजे.

पेरकी समाजात आई-वडिलांच्या प्रोत्साहनामुळे आंतरजातीय विवाह खूप झाले आहेत. यामुळे समाजात मुलगे आणि मुलींचे प्रमाण बिघडले आहे. मुलींची संख्या मुलांच्या तुलनेत खूप कमी झाली आहे, तर अविवाहित मुलांची संख्या वाढली आहे. या समस्येवर जनजागृतीची गरज आहे.

पेरकी समाजातील मुलांसाठी समाजात मुली मिळत नसतील, तर इतर तेलगू भाषिक समाजातील मुलींशी विवाह संबंध जोडण्यास काहीच गैर नाही.

नागपूरची एक तेलुगू भाषिक समाज संघटना या उद्देशाची पूर्तता करण्यासाठी प्रयत्न करत आहे. याच सर्व विषयांवर आधारित पेरकी समाजाचा हा विवाह विशेषांक आहे.

### भविष्यातील दृष्टिकोन !

भविष्यात समाजाची एकता आणि विवाह यांसंबंधी मोठी आव्हाने उभी राहतील. पुढील दहा वर्षांत एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) मुळे जग बदलेल. 'डिझाईन बेबी' तयार होतील, तेव्हा कुटुंब आणि विवाहाची आवश्यकता कदाचित भासणार नाही. शरीराच्या गरजेपलीकडे, विवाह हा कुटुंबासाठी आवश्यक असतो. सध्याची तातडीची समस्या म्हणजे आंतरजातीय विवाह झाल्यामुळे समाजातील मुलींची संख्या घटणे, वाढणारे घटस्फोट आणि पुनर्विवाह न होणे. भविष्याऐवजी या वर्तमान समस्यांवर लक्ष केंद्रित करणे अधिक महत्त्वाचे आहे.
या समस्येवर लक्ष केंद्रित करणे योग्य ठरेल.

या पुस्तकातील सर्व चुकांसाठी मी जबाबदार आहे, मी क्षमा मागतो.
धन्यवाद!

- **श्री प्रकाश पारो गणपतराव गोविन्दवार**, नागपूर
मोबाइल - 9096170712

# विवाह एक संस्कार आहे !
# पेरकी समाजाच्या 'संस्कारा'चे जतन करा !



लेखक :
**श्री नारायण रामन्ना कंदमवार पाटील, पुणे.**
मोबाईल - 9860251871



हिंदू धर्म हा केवळ एक धर्म नसून, ती एक विस्तृत जीवनशैली आहे, ज्याचा पाया संस्कारांवर आधारलेला आहे. मानवी जीवनातील जन्म, विवाह आणि मृत्यूपर्यंतचे टप्पे या संस्कारांच्या माध्यमातून जोडले गेलेले आहेत. विवाह हा हिंदू धर्मातील सोळा संस्कारांपैकी एक अत्यंत पवित्र आणि मौलिक संस्कार मानला जातो. हा केवळ दोन व्यक्तींचे मिलन नसून, दोन कुटुंबांना आणि त्यांच्या परंपरांना एकत्र आणणारा सेतू आहे.

हिंदू धर्माच्या या विशाल सागरात अनेक जाती-जमातींचा समावेश आहे, आणि याच प्रवाहाचा एक भाग पेरकी/पेरका/पेरकेवाड/पेरकेवार तसेच पेरकोल्लू हा समाज आहे. वर्षानुवर्षे या समाजाने हिंदू धर्माचे आणि त्यांच्या मूलभूत संस्कारांचे श्रद्धापूर्वक पालन केले आहे. मात्र, सध्याच्या काळात, तथाकथित आधुनिकतेच्या प्रभावामुळे आणि चुकीच्या प्रवृत्तींच्या आकर्षणामुळे या समाजासमोर आंतरजातीय विवाहांचे एक मोठे आव्हान उभे राहिले आहे. यामुळे समाजाची एकता आणि अखंडता धोक्यात येत असल्याची भीती व्यक्त होत आहे.

### आंतरजातीय विवाहाचे आव्हान आणि त्याचे परिणाम वाइट आहे.

आंतरजातीय विवाह वाढल्यास चालीरितींमध्ये 'भेसळ' निर्माण होते. एका प्रशनच्या उत्तरात म्हटल्याप्रमाणे, 'आईच लेकरांची पहिली गुरू' असल्याने, दुसऱ्या जातीच्या मुली समाजात आल्यास, त्यांच्या मूळ जातीचे संस्कार पुढील पिढीला मिळण्याची शक्यता असते. परिणामी, परंपरा, रूढी आणि मूल्ये हळूहळू कमी होऊ शकतात. समाजात बाहेरून आलेल्या वधूमुळे किंवा आपल्या घरातील मुली दुसऱ्या

जातीत गेल्यामुळे समाजाप्रतीचा आदरभाव कमी होतो आणि समाजाची एकता व ऐक्य कमकुवत होते. यातून समाज नष्ट होण्याच्या मार्गावर जाऊ शकतो.

**समाजांतर्गत विवाहाची आवश्यकता आणि फायदे अनेक आहे.**

समाज बांधणीसाठी समाजांतर्गत विवाह हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. जेव्हा विवाह एकाच समाजात होतात, तेव्हा कुटुंबांमध्ये नातेसंबंध निर्माण होऊन जिव्हाळा वाढतो. यामुळे समाजाची एकता आणि अखंडता बळकट होते.

समाजांतर्गत विवाहांमुळे संस्कार, चालीरीती आणि परंपरा अबाधित राहतात. युवक-युवतींना आपल्याच समाजात सुंदर, सुशिक्षित आणि संस्कारी जोडीदार मिळू शकतो. विशेष म्हणजे, पत्नीला आपलेच संस्कार, देवपूजा आणि परंपरा माहीत असल्याने तिला मार्गदर्शनाची फारशी गरज भासत नाही, ज्यामुळे घरगुती जीवन सुसंवादी राहते.

आपल्याच समाजातील विवाहांमुळे परंपरा, मूल्ये टिकून राहतात आणि समाजाचे भविष्य सुरक्षित होते.

**समाजसेवकांची भूमिका आणि कार्यनीती**

या आव्हानाचा सामना करण्यासाठी समाजसेवकांनी पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे. त्यांची भूमिका केवळ मध्यस्थाची नसून, मार्गदर्शकाची आणि जागृती करणाऱ्याची असायला हवी.

प्रभावी रणनिती खालीलप्रमाणे असावी असे माझे मत आहे.

1. **पालकांचे प्रबोधन** : पालकांनी लहानपणापासूनच मुलांना जातीसंबंधी माहिती, संस्कार आणि परंपरांचा परिचय करून द्यावा. देवपूजा, सणवार या निमित्ताने हे शक्य आहे.

2. **प्रचार आणि प्रसार** : समाजसेवकांनी व्याख्याने, मेळावे, परिसंवाद आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून समाजाच्या रूढी, परंपरा आणि संस्कारांचे महत्त्व सर्वांपर्यंत पोहोचवावे. वादविवाद स्पर्धा आयोजित करून युवक-युवतींना जागृत करावे.

3. **विवाह जुळवण्याचे प्रयत्न** : लग्नयोग्य मुला-मुलींची यादी तयार करून त्यांच्याशी संपर्क साधावा आणि मध्यस्थी करून विवाह जुळवून आणावेत.

4. **चुकीच्या प्रवृत्तीपासून सावध** : युवक-युवतींना आंतरजातीय विवाहाच्या समस्या आणि परिणामांबद्दल प्रत्यक्ष उदाहरणे देऊन माहिती द्यावी. त्यांना चुकीच्या प्रवृत्तींपासून सावध करावे.

5. **सुधारणेवर भर** : समाजांतर्गत विवाहांना प्रोत्साहन देण्यासाठी हुंडा प्रथा बंद करण्यावर भर द्यावा आणि मातृभाषेत शिक्षण तसेच संस्कृत व धार्मिक शिक्षणाला प्राधान्य द्यावे.

गोड बोलणे, आदरभाव राखणे आणि सोप्या भाषेत विवाहाचे महत्त्व समजावून सांगणे, तसेच व्यवहारातील अनुभव सांगून लोकांना पटवून देणे ही समाजसेवकांची संवाद शैली असावी. समाजाच्या भविष्याच्या सुरक्षेसाठी आणि परंपरांच्या जतनासाठी स्वयंस्फूर्त समाजसेवकांचे सहकार्य व आर्थिक पाठबळ ही काळाची गरज आहे.,,,,,,,,,,

विवाह हा एक संस्कार आहे, करार नाही. पेरकी समाजाने आपल्या महान परंपरा आणि संस्कारांचे जतन करण्यासाठी समाजांतर्गत विवाहाचे महत्त्व ओळखणे आणि त्या दिशेने प्रयत्न करणे आवश्यक आहे. यामुळे केवळ कुटुंबेच नव्हे, तर संपूर्ण समाजाचे भविष्य सुरक्षित राहील.

**माझा संक्षिप्त परिचय !**


मी नारायण रामन्ना कंदमवार पाटील, पुणे येथील साहित्य प्रेमी आहे. मला कथा, सत्य घटना आणि कवितांमध्ये विशेष रुची आहे.

मी मराठी भाषेत 'फुलपाखरू' (लहान मुलांसाठी) आणि 'साद विजयाची' हे दोन कविता संग्रह प्रकाशित केले आहेत.

माझ्या साहित्य क्षेत्रातील योगदानाबद्दल मला अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, मुंबई कडून सन्मानित करण्यात आले आहे.

मी माझ्या रचना 'प्रतिलिपी' ॲप आणि अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या व्यासपीठावर नियमितपणे सामायिक करतो.



# झाडीपट्टीतील पेरकी समाजः निसर्गरम्य भूमीतील परंपरा आणि विवाह विधी !



- श्री विलास शंकर बोलगोडवार,
सेवानिवृत्त शिक्षक, मुकाम पोस्ट आष्टी,
जिला गढ़चिरौली मोबाइल - 9637460893

महाराष्ट्राच्या झाडीपट्टी प्रदेशातील, म्हणजेच चंद्रपूर, भंडारा, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यांच्या हिरव्यागार भूमीत, पेरकी समाज मोठ्या संख्येने वसलेला आहे. हा प्रदेश म्हणजे हिरवा निसर्ग, उंच डोंगररांगा, बारमाही वाहणाऱ्या नद्या आणि खोल उदरात मौल्यवान खनिजे जतन करणारी माती यांचा संगम आहे. या निसर्गाच्या कुशीत नांदणारा माझा शेतकरी बांधव आणि त्याला मदतीला सदैव धावणारा हा पेरकी समाज, आपल्या मूळ सांस्कृतिक मुल्यांशी आजही घट्ट जोडलेला आहे.

**शिक्षणामुळे बदल, परंपरेशी अतूट नाते**

आज शिक्षणामुळे या समाजात मोठा बदल घडून आला आहे. डॉक्टर, वकील, अभियंता, तसेच राजकारणाच्या उच्च पदांपर्यंत या समाजातील व्यक्तींनी मजल मारली आहे. जीवनात आमुलाग्र बदल घडून आले असले तरी, आपल्या सामाजिक आणि सांस्कृतिक मुल्यांशी असलेली नाळ या समाजाने तोडलेली नाही.

आपल्या पूर्वापार चालत आलेल्या प्रथा, परंपरा, संस्कृती आणि संस्कार हे आजही मोठ्या मनापासून जपले जातात. अगदी देवा-देवळांपासून, गोत्र-कुलदेवतांपर्यंत आणि जेवण बनवण्याच्या पद्धतींपासून ते विवाह विधींपर्यंत, प्रत्येक गोष्ट पेरकी समाजाने हृदयाच्या कप्प्यात जतन केली आहे.

**विवाह संस्था : जीवनाचा आधारस्तंभ**

परमेश्वराने निर्माण केलेले हे जग अविरल चालू ठेवण्यासाठी विवाह संस्था पवित्र आणि आवश्यक मानली जाते. पूर्वीच्या काळात, मुलगी उपवर होताच वधूच्या माता-पित्यांनाच नवरा मुलगा शोधण्यासाठी उंबरठे झिजवावे लागायचे. मुलाकडील मंडळीसुद्धा वधूच्या रक्तसंबंधीत आप्त-मित्रमंडळींकडे चौकशी करायची.

आज काळ पूर्णपणे बदलला आहे. सुशिक्षित तरुण पिढी आपल्या आई-वडिलांना त्रास न देता स्वतःचा जोडीदार शोधते, मात्र हे निवडलेले नातेसुद्धा आपल्या पारंपरिक प्रथा, परंपरा, रितीरिवाज यांच्या चौकटीतून पूर्णत्वास जाईपर्यंत, समाज आपल्या संस्कारांना छेद देत नाही.

पालकांनी आपल्या मुला-मुलींच्या जोडीदाराची निवड करताना योग्य काळजी घेणे हे त्यांचे कर्तव्यच आहे. कारण, 'लग्न करिसी काय आंधळे होऊन' (लग्न करून संसार आपल्याच हाताने मोडू नकोस) अशी एक सावधगिरीची म्हण इथे रूढ आहे.

### पेरकी समाजाचे पारंपरिक विवाह विधी

पेरकी समाजाचा विवाह सोहळा म्हणजे केवळ लग्न नसुन, तर तो एक संस्कृतीचा उत्सव असतो.

मुख्य विवाह समारंभापूर्वी अनेक महत्त्वाचे विधी उत्साहाने पार पडतातः

- **साखरपुडा / टिळा :** वधू-वरांचे परीक्षण झाल्यावर दोन्ही कुटुंबातील उपस्थित गणगोतांच्या साक्षीने साखर (पोहनी) भरवणे, टिळा लावणे आणि सर्व विषयांवर सांगोपांग चर्चासत्र घेतले जाते. मोठ्या आनंदाने ही बैठक विसर्जित होऊन शुभकार्याला सुरुवात होते.
- **माऊलीची विधी :** माऊलीला पूजन करून बकरा (बोकड) बली दिला जातो.
- **मंडप/हळदीचा विधी :** या समारंभात सर्व नातेवाईक एकत्र येतात आणि नाचत-गात हळदीचा विधी पूर्ण करतात. वराच्या घरी संध्याकाळी कुलदेवताला भंडाऱ्याने उदो उदो करतात. भाजीबोणम कार्यक्रम पार पाडतात.
- **शुभ विवाह :** ठरलेल्या वेळी लग्न सोहळा पार पडतात आणि हा सोहळा अगदी उत्साहात पार पडतो. कोणताही अमंगल न होता भविष्य सुखकर जावे, या इच्छेने विधी पार पाडले जातात.
- **आशीर्वाद व स्वागत समारंभ :** विधी पूर्ण झाल्यावर वधू-पिता, माता, गणगोत वधू-वरांना अभिनंदन करतात आणि 'दिले घरी सुखी रहा' असा आशीर्वाद देतात. त्यानंतर वरकडील मंडळी स्वागत समारंभ आयोजित करतात. नवदांपत्यास शुभेच्छा देऊन, गोड भोजनाचा आस्वाद घेऊन आणि भेटीगाठी घेऊन पाहुणे आपापल्या गावी परततात.

अशा प्रकारे, पेरकी समाज आधुनिकतेच्या वाटेवर चालत असला तरी, आपल्या पारंपरिक विवाह विधी आणि जीवनमूल्यांचे पावित्र्य जपून ठेवतो, जो या झाडीपट्टी संस्कृतीचा एक सुंदर ठेवा आहे.



# हुंडा एक सामाजिक समस्या व उपाय योजना

**भगिरथ हनमंतराव येंबडवार**
सेवा निवृत प्राध्यापक
आलापल्ली जि. गडचिरोली. मो. 9422676765



आज भारतिय समाज व्यवस्थेमध्ये अनेक वर्षापासुन समाज घातक अनिष्ट अशा प्रथा आणि परंपरा असल्यामुळे त्याचा समाज जिवनावर विपरीत परीणाम होताना आपणास दिसुन येत आहे. त्यातील एक समाज घातक प्रथा म्हणुन हुंडा या प्रथेकडे पाहता येईल. सर्व समाज व जातीमध्ये किंवा प्रत्येक धर्मात हुंडा दिला जातो आणि घेतला जातो. हि पद्धत अगदी प्राचिन काळापासुन भारतात चालत आलेली आहे. वेद उपनिर्षेधामध्ये व देवदेवतांमध्ये आणि राजकुमारांच्या विवादामध्ये सुद्धा मौल्यवान वस्तु भेट दिल्याचे आढळुन येते किंवा तसा उल्लेख प्राचिनलिखानांमध्ये सापडतो.

आज समाजात हुंडा देणे घेणे ही सामाजिक प्रतिष्ठेचे मानले जाऊ लागले. कालांतराने वरिष्ठ समाजाकडुन कनिष्ठ समजाकडे ही प्रथा संकमित होऊ लागल्याचे आपणास दिसुन येत आहे.

हुंडा पद्धतीचे सविस्तर विवेचन :-

हुंडा ही एक वधु पक्षाकडुन वर पक्षाकडे दिली वा घेतली जाणारी निश्चित स्वरूपाची भेट असुन याची पुर्तता नाही झाली तर विवाह विधी पार पाडत नाहित. आज ही प्रथा एक प्रकारे विवाहातील वराची किंमतच ठरवत असुन समाजामध्ये आर्थिकदृष्ट्या गरिब असणाऱ्या कुटुंबातील मुला मुलींच्या विवाहासाठी ही प्रथा जिवघेणी ठरत आहे. त्यामुळे योग्य वेळी योग्य वयात लग्न न होणे, समाजामध्ये व्याभीचाराने प्रमाण वाढण्याचा संभाव्य धोका होऊ शकतो. ऐपत नसतांना कर्ज काढुन मुलीचे लग्न करणे, पुन्हा कर्जबाजारी होवुन अनेक कुटुंब रसातळाला जातात.

परीणामी घर, जमिण, सोने, नाणे विकण्याची वेळ त्यांच्यावर येते. विवाहामध्ये ठरलेल्या हुंड्याची वा वस्तु देण्यास विलंब झाला तर मुलींचा अमानुष्य छळ केला जातो अपमानकारक वागवणे, उपाशी ठेवणे, विनाकारण चरित्र्यावर संशय घेणे, असे प्रसंग काही दोष नसतांना मुलीवर सतत येत असतात.

हुंडा या प्रथेमुळे विनाकारण समाजामध्ये मुलींच्या जन्मावर प्रश्नचिन्ह निर्माण होवुन गर्भपातासारखे घृणास्पद कृत्ये समाजामध्ये केले जातात. म्हणजेच मुलीला जन्मापासुनच रोखले जाते. मुलगी जन्माला येणे म्हणजे एक प्रकारे कुटुंबावर संकटच ओढावले असे माणले जाते. मुलगी कुटुंबात जन्म घेणे म्हणजे एक प्रकारे आपत्तीच किंचा पुर्वी जन्माचे पापच आहे असे समजणे. आज सुद्धा समाज स्त्रीकडे उपभोग्य वस्तु म्हणुनच पाहत आला आहे. तसेच ही समाजाची वृत्तीच मुळामध्ये स्त्री-पुरूष समानतेसाठी घातक ठरत आहे. समाज नेहमी स्त्री ला कनिष्ठच मानत आला आहे. समाजात तिचे दुय्यम स्थान असल्यामुळे

तिची वेळोवेळी अवहेलना होत आहे. भारताच्या प्राचीन इतिहासाकडे आपण सुक्ष्मपणे पाहीले तर स्त्रीला मानाचे स्थान होते व स्त्री मध्ये देवीदेवतांचा अंश आहे असे समजुन समाज तिची पुजा केली जात असे. पण काळाच्या ओघामध्ये भारतिय स्त्री-जिवनाला दास्यत्व प्राप्त झाले.

स्त्रीयांचे जीवन विविध समस्यांनी ग्रासले गेले आहे, एकंदरीत आपणाला असे दिसुन येते. त्यापैकीच हुंडा ही एक भीषण व स्त्रीयांचे जीवन उध्वस्त करणारी सामाजिक समस्या असुन तिचे स्वरूप आज दिवसेंदिवस गंभीर बनत चाललेले दिसते. सामाजिक प्रतिष्ठा म्हणुन ही प्रथा रूढ झाली व आज हीच प्रथा सामाजिक समस्या म्हणुन भारतिय समाज व्यवस्थेमध्ये सर्वत्र दिसुन येत आहे.

हुंडा पद्धतीची प्रमुख काही कारणे :-

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये हुंडा ही अनिष्ठ प्रथा रूजण्याची आणि झपाट्याने वाढण्याची काही कारणे आहेत. त्यापैकी काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे -

१. सामाजिक प्रतिष्ठेसाठी :-

हुंडा देणे आणि घेणे हे सामाजीक प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असल्यामुळे जास्त हुंडा घेणे किंवा देणे म्हणजे प्रतिष्ठत व कमी हुंडा दिला वा घेतला तर ते कुटुंब कमी प्रतिष्ठीत हा समज सवत्र पसरला होता. म्हणजेच मोठेपणाची खोटी प्रतिष्ठा हे एक प्रमुख कारण होय.

२. समाज मान्य मार्गाने लैंगिक गरजांची पुर्तता करणे :-

अन्न, वस्त्र व निवारा एवढीच लैंगिक गरजही महत्वाची असुन या गरजेची पुर्तता करण्यासाठी समाज मान्य मार्ग म्हणजे विवाह अपत्य प्राप्ती होवुन वंश वाढवणे, कुटुंबाचे व समाजाचे सातत्य टिकवणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्यामुळे विवाहाचा हा राजमार्ग अनिवार्य ठरलेला आहे.

३. सामाजीक प्रथा :-

हिंदुच्या धर्मशास्त्रातील विविध उदाहरणावरून प्रत्येक आई वडिलांनी आपल्या मुलीवरील प्रेमापोटी ठरावीक वस्तुंची भेट विवाहप्रसंगी दिले जातात किंवा मौल्यवान दागिणे, अलंकार, संपत्ती विवाहात देण्याच्या पद्धतीमुळे कालांतराने याला अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे, हे ही एक कारण मानले जात आहे.

४. कुरूप मुली :-

मुलगा गोरा असो किंवा काळा असो पण प्रत्येक मुलाला स्वत:ला बायको पाहताना ती सुंदरच असावी अशी अपेक्षा असते. पण या समाजामध्ये कुरूप मुलींचा झालेला जन्म व नंतर कालांतराने आलेले कुरूपत्व; किंवा व्यंग झाकण्यासाठी अमाप पैश्याच्या स्वरूपात हुंडा दिला जातो.

५. वडीलांच्या संपत्तीत मुलींचा वाटा :-

प्रचलीत १९५६ च्या हिंदु वारसा हक्काच्या कायद्याने मुलीला तिच्या वडिलांच्या मालमत्तेत मुलाप्रमाणे समान अधिकार व हक्क आहे. त्यामुळे हुंडा न घेणे आणि न देणे बरे !

# शोध पेरकी समाजात पुनर्विवाहाचा !
# आजची वर्तमान परिस्थिती !



- कु. माया विठ्ठलराव एंचलवार,
शिक्षिका यवतमाळ
मो. 7972307189

पेरकी समाजात पुनर्विवाहाची आजची वर्तमान स्थिती परिस्थिती फारच खराब आहे. अत्यंत निंदनीय परीस्थिती आहे समाजात घटस्फोटीत महिलांचे किंवा मुलींचे विवाह करणे फारच कठीण आहे कारण समाज गोष्टीला मान्यता देत नाही या गोष्टीला मान्यता मिळायला समाज सुसंस्कृत आणि विचाराने आधुनिक हवा .

संकुचित विचारांचा समाज ज्या समाजाने हुंडा घेणे आणि देणे यालाच महत्व दिले जाते तो समाज सर्व अश्या करण्यास मागेपुढेच बघणार ते इतकी समाजाची विचार करण्यासाठी विचार प्रगल्भ हवेत. सर्वप्रथम पेरकी समाजात जी  श्रीमंत आणि गरीब ही दरी आहे ती मिटायला हवी .. माणुसकीचा विचार व्हायला हवा.

घटस्फोटीत स्त्रियांना नातेवाईकच काय समाज सुद्धा वाईट समजतात.  साथ सोडतात इतरांचा तर विचारच करायला नको सर्व बाजूंनी घटस्फोटीत महिला खचून गेलेली असते. अचानक पणे आयुष्यात अशी गोष्ट घडलेली असते तिने या सर्वांचा विचारही केलेला नसतो कारण नवऱ्याला तिने सोडले काय आणि तिने नवऱ्याने तिला सोडले काय शेवटी महिलांनाच नाव  ठेवली जातात .

समाज चांगला विचार करू शकत नाही कारण पुरुष एका वर्षात लग्न करून मोकळा होतो, त्याला मूल आपल्या बायकोचा सोडा मुलांच्या भावनांचा विचार न करता दुसऱ्या लग्न करतो कारण अशा माणसाचं लग्न करून त्याला सुद्धा समाजातील दलालच पुढे येतात आणि अशा पुरुषांना साथ पण देतात सर्व बाजूंनी खचलेल्या स्त्रियांना पैसा महत्त्वाचा नसतो ते म्हणतात ना की माणसाला सावली सुद्धा एक दिवस साथ देत नाही मग नातेवाईक पण अशा परिस्थितीत साथ देत नाही.

पेरकी समाजात कस आहे ना स्त्रियांना मूलबाळ असताना त्यास यासोबत घटस्फोटीत स्त्रियांसोबत लग्न करायला समाज मागे पुढे बघतात, पण पुरुषांना जर मुलं असतील तर मग मात्र त्याच्यासोबत लग्न करायला तयार होतात आणि अशा पुरुषाला समाज मुलगी देतात जोपर्यंत आज दुजाभाव संपत नाही तोपर्यंत पुनर्विवाह करू शकत नाही.

आर्थिक बाबतीत ति खतलेलीच असते आधीच्या समाजात आधीच्या वेळेस पुनर्विवाहची परिस्थिती खराबच होती आणि आता पण खराबच आहे, घटस्फोटीत मुलींच्या लगनसाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा समाजातील चांगल्या विचारांच्या

सुशिक्षित लोकांनी समोर यायला हवे याबाबत मेळावे पण घ्यायला हवेत विधवा स्त्रियांना जेवढा त्रास होत नाही तेवढाच त्रास घटस्फोटीत स्त्रियांना होतो समाजात खून करून पळून जाणाऱ्या लोकांच्या मुलींची लग्न करायला समाज तयार होत असतो, पण इज्जतीने जगणाऱ्या घटस्फोटीत स्त्रियांच्या मूली मूलींशी लग्न करायला समाज मागे पुढे बघत असतो.

पुनर्विवाह करताना अनेक अडचणी येतात तिच्या बाबतीत चांगले विचार करून पुनर्विवाह व्हायला हवेत पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी चांगले लोकच एकत्र येणे आवश्यक आहे, मनात एक बाहेर एक अशी दाखवणारी लोक समाज घडू शकत नाही यासाठी पेरकी समाज जागृत झाला पाहिजे, समाजातील लोकांना पण याबाबती जागरूक करून त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणायला पाहिजे घटस्फोटीत मुलीच्या लगनसाठी पुढाकार घ्यायला हवा तिच्या मताचा सन्मान करायला हवा तिच्या भावनांचा विचार करून तिला सुद्धा मनाने जगण्यास व्यासपीठ उपलब्ध करून द्‌यायला हवे.

जोपर्यंत समाजात दलालीपणा करून लग्न जमवून आणतात,अश्या लोकांचा पण विरोध करायला हवा. स्रियांने स्वत च्या पायावर उभ राहून आपल्या विचारावर ठाम राहायला हवे.

पेरकी समाजात पुनर्विवाहाची आजची वर्तमान स्थिती परिस्थिती फारच खराब आहे. अत्यंत निंदनीय परीस्थिती आहे समाजात घटस्फोटीत महिलांचे किंवा मुलींचे विवाह करणे फारच कठीण आहे कारण समाज गोष्टीला मान्यता देत नाही या गोष्टीला मान्यता मिळायला समाज सुसंस्कृत आणि विचाराने आधुनिक हवा .

संकुचित विचारांचा समाज ज्या समाजाने हुंडा घेणे आणि देणे यालाच महत्व दिले तो समाज सर्व अश्या गोष्टीकरण्यास मागेपुढेच बघणार ते इतकी समाजातील लोकांचे विचार करण्यासाठी विचार प्रगल्भ हवेत.

सर्वप्रथम पेरकी समाजात जी श्रीमंत आणि गरीब ही दरी आहे ती मिटायला हवी .. माणुसकीचा विचार व्हायला हवा घटस्फोटीत स्रियांना नातेवाईकच काय समाज सुद्धा वाईट समजतात साथ सोडतात इतरांचा तर विचारच करायला नको सर्व बाजूंनी घटस्फोटीत महिला खचून गेलेली असते.

अचानक पणे आयुष्यात अशी गोष्ट घडलेली असते तिने या सर्वांचा विचारही केलेला नसतो कारण नवऱ्याला तिने सोडले काय आणि तिने नवऱ्याला सोडले काय शेवटी महिलांनाच नाव ठेवली जातात.ती कीतीही जपून वागली तरी तीला नावबोट ठेवली जातात .समाज चांगला विचार करू शकत नाही कारण पुरुष एका वर्षात लग्न करून मोकळा होतो, त्याला मूल आपल्या बायकोचा सोडा मुलांच्या भावनांचा विचार न करता दुसऱ्या लग्न करतो कारण अशा माणसाचं लग्न करून त्याला सुद्धा समाजातील दलालच पुढे येतात आणि अशा पुरुषांना साथ पण देतात सर्व बाजूंनी खचलेल्या स्रियांना

पैसा महत्त्वाचा नसतो ते म्हणतात ना की माणसाला सावली सुद्धा एक दिवस साथ देत नाही मग नातेवाईक पण अशा परिस्थितीत साथ देत नाही.पेरकी समाजात कस आहे ना स्त्रियांना मूलबाळ असताना त्यास यासोबत घटस्फोटीत स्त्रियांसोबत लग्न करायला समाज मागे पुढे बघतात.

पण पुरुषांना जर मुलं असतील तर मग मात्र त्याच्यासोबत लग्न करायला तयार होतात आणि अशा पुरुषाला समाज मुलगी देतात जोपर्यंत आज दुजाभाव संपत नाही तोपर्यंत पुनर्विवाह करू शकत नाही, आर्थिक बाबतीत ती खचलेलीच असते आधीच्या समाजात आधीच्या वेळेस पुनर्विवाहची परिस्थिती खराबच होती आणि आता पण खराबच आहे, घटस्फोटीत मुलींच्या लगनसाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा. पुरूष जर घटस्फोटीत स्त्रीयांना तिच्या मुलांसकट स्विकारत नसेल तर मूल असणार्या पुरुषांसोबत घटस्फोटीत स्त्रीयांनी पण लग्न करू नये.

पुरूषांनी सुद्धा मुल असणार्या स्त्री बद्दल आपूलकीची भावना ठेवायला पाहीजे.समाजातील चांगल्या विचारांच्या सुशिक्षित लोकांनी समोर यायला हवे याबाबत मेळावे पण घ्यायला हवेत विधवा स्त्रियांना जेवढा त्रास होत नाही तेवढाच त्रास घटस्फोटीत स्त्रियांना होतो समाजात खून करून पळून जाणाऱ्या लोकांच्या मुलींची लग्न करायला समाज तयार होत असतो, पण इज्जतीने जगणाऱ्या घटस्फोटीत स्त्रियांच्या मूली मूलींशी लग्न करायला समाज मागे पुढे बघत असतो, पुनर्विवाह करताना अनेक अडचणी येतात तिच्या बाबतीत चांगले विचार करून पुनर्विवाह व्हायला हवेत पुनर्विवाह घडवून आणण्यासाठी चांगले

लोकच एकत्र येणे आवश्यक आहे, मनात एक बाहेर एक अशी दाखवणारी लोक समाज घडवू शकत नाही, यासाठी पेरकी समाज जागृत झाला पाहिजे, समाजातील लोकांना पण याबाबती जागरूक करून त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणायला पाहिजे घटस्फोटीत मुलीच्या लगनसाठी पुढाकार घ्यायला हवा तिच्या मताचा सन्मान करायला हवा तिच्या भावनांचा विचार करून तिला सुद्धा मनाने जगण्यास व्यासपीठ उपलब्ध करून द्यायला हवे.

जोपर्यत समाजात दलालीपणा करून लग्न जमवून आणतात,अश्या लोकांचा पण विरोध करायला हवा. त्यात गरीब घराण्यातील मुलगी असेल तर मग विचारायलाच नको, तिच्याबद्दल नको ते विचार करतात.

ज्या मुलांनी घटस्फोटीत स्त्रीयांच्या मुलींशी लग्न करून तीचा सन्मान कायम ठेवला त्या मूलांचा त्या परीवारातील लोकांचा मेळाव्यात सन्मान करायला हवा.स्रियांने स्वत च्या पायावर उभ राहून आपल्या विचारावर ठाम राहायला हवे,

# पेरकी समाजात हल्ली विवाह जुळवण्यासाठी कोणी मदत करत नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे!



**श्री राजेंद्र अनंतराम तामशेटवार,**
संचालक - आर. के. इलेक्ट्रिकल्स,
दीक्षित नगर, नारी, नागपूर
मो. 9881891533

**पेरकी समाजात विवाह जुळवण्याची परंपरा! एक बदलता दृष्टिकोन!**

पंचवीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे, जेव्हा पेरकी समाजात विवाह जुळवण्याची प्रक्रिया खूप सोपी आणि पारंपरिक होती. नातेवाईक आपल्या नातेसंबंधातील मुला-मुलींसाठी पेरकी समाजातच वधू-वर शोधत असत. समाजातील वडीलधारी मंडळी तरुण मुला-मुलींसाठी स्थळे घेऊन येत असत आणि वेळेत त्यांची लग्ने होत होती. त्या काळात अविवाहित राहणे जवळजवळ अशक्य होते.

पण आजची परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे. पेरकी समाजात विवाह जुळवण्यासाठी कोणीही मदत करत नाही, ही खूप दुर्दैवी गोष्ट आहे. याची कारणे शोधणे आवश्यक आहे. पेरकी समाजातील लोक आणि नातेवाईक विवाह जुळवण्यास मदत करत नसल्यामुळे पेरकी समाजातच आंतरजातीय विवाह होत आहेत.

- **आधुनिक पिढीचे अनपेक्षित वर्तन :** आजच्या पिढीवर वडीलधाऱ्यांचा विश्वास राहिलेला नाही. नवीन पिढीचे वर्तन अनपेक्षित झाले आहे, ज्यामुळे वडीलधारी मंडळी कोणताही धोका पत्करण्यास तयार नाहीत.
- **विवाह जुळवण्याचा धोका :** सर्वच समाजांमध्ये विवाह जुळवण्याचे काम खूपच धोक्याचे झाले आहे. तरुण पिढीमध्ये घटस्फोटाच्या घटना वाढल्या आहेत, ज्यामुळे विवाह जुळवणाऱ्या व्यक्तीवर जबाबदारी येते.
- **विश्वासाची कमी :** नवीन पिढीवरील विश्वास कमी झाला आहे, ज्यामुळे वडीलधारी पिढी विवाह जुळवण्याच्या कामात पडू इच्छित नाही.

आता ती वेळ आली आहे की पेरकी समाजातील पालकांनीच पुढाकार घेऊन आपल्या मुलामुलींचे विवाह जुळवले पाहिजेत. अन्यथा, आंतरजातीय विवाह आणि घटस्फोटाची प्रकरणे आणखी वाढतील. पेरकी समाजाने आपल्यातील परस्पर संबंध मजबूत करण्याची गरज आहे, जेणेकरून समाजात लगनची प्रक्रिया पुन्हा सोपी आणि पारंपरिक होईल.

# पांढरकवड्यातील पेरकी जनसंघम संगठन चे पहिल्या सामूहिक विवाह युगप्रवर्तक सोहळा ! एका विश्वासाची आणि एकजुटीची गाथा !



- **श्री. मदन जिड्डेवार,**
भूतपूर्व सचिव पेरकी जनसंघम विदर्भ,
पांढरकवडा, जिला यवतमाल
मो. 9422166979

पेरकी जनसंघमचे तत्कालीन सचिव म्हणून, 1992 साली पांढरकवडा येथे आयोजित केलेला समाजाचा पहिला सामूहिक विवाह मेळावा हा असाच एक अविस्मरणीय आणि ऐतिहासिक क्षण होता. जिथे आज 'जिड्डेवार भवन' उभे आहे, त्याच खुल्या रंगमंचावर (पक्क्या स्टेजवर) हा सोहळा पार पडला.

तेव्हा मी अवघ्या 32 वर्षांचा होतो. पण माझ्यासोबत इतर युवक, ज्येष्ठ आणि अनेक प्रौढ सदस्यांनी अफाट मेहनत घेतली. हा मेळावा व्हायलाच हवा, याबद्दल मी आजही अत्यंत सकारात्मक आणि ठाम आहे.

विश्वास संपादन करण्याचे मोठे आव्हान हा सोहळा आयोजित करताना आम्हाला सर्वात मोठा त्रास झाला असेल, तर तो जोडप्यांना तयार करण्यात. कारण, ही कल्पना समाजासाठी पूर्णपणे नवी होती. कोणालाच खात्री पटत नव्हती, विश्वास बसत नव्हता. दोन्ही पक्षांना (वर आणि वधू पक्षाला) विश्वासात घेऊन, त्यांची समजूत घालून त्यांना तयार करावे लागत होते.

याच एका कामात आमचे दोन महिने खर्च झाले. अर्थात, एका जोडप्याकडून आम्ही केवळ 5000 रुपये घेतले. पैशाची अडचण कधीच मोठी नसते, कारण एकदा लोकांना कार्यावर विश्वास बसला की ते मदतीसाठी धावतात. पण, एकदा काही जोडपी निश्चित झाल्यावर आणि आमची अफाट मेहनत पाहून लोकांचा विश्वास गगनाला भिडला!

**एकत्रित प्रयत्नांची शक्ती !**

जोडपी निश्चित झाल्यावर नियोजन महत्त्वाचे होते. अनेक समिती तयार करण्यात आल्या आणि सर्वांच्या सहकार्याने काम सुरू झाले. या भव्य सोहळ्याला जवळपास पाच ते सहा हजार लोकांची उपस्थिती होती!

ती त्या समाजाची गरज होती. तेव्हा समाजाची आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती तशीच होती. आज परिस्थिती खूप चांगली आहे. त्यामुळे आज कोणताही तरुण-तरुणी सामूहिक मेळाव्यात लग्न करायला सहजासहजी तयार होत नाही, हे वास्तव आहे.

**आजही सामूहिक विवाहाची गरज**

परंतु, आजही माझा ठाम विचार आहे की सामूहिक विवाह मेळावे व्हायलाच हवेत. यामुळे लोकांचा वेळ आणि पैसा मोठ्या प्रमाणावर वाचतो. मेळावा घेताना लागणारे साहित्य, जागा, पैसा आणि लोकांची उपस्थिती हे सर्व आज जुळवून आणता येईल. प्रश्न आजही एकच आहे. जोडपे तयार करण्याचा!

माझा 32 वर्षांपूर्वीचा अनुभव सांगतो की, आजही आमचा 60-70 टक्के वेळ याच कामात जाईल. एखादे जोडपे तयार झाले की चार दिवसांनी निरोप यायचा, 'आमची दुसरी पार्टी नाही म्हणत आहे.' माझ्या अनुभवानुसार, सर्व गोष्टी साध्य होतील, फक्त हा एकच घटक कठीण आहे.

**इतर समृद्ध समाजांकडून शिकवण**

आर्थिकदृष्ट्या अत्यंत प्रबळ असलेले आर्य वैश्य यांसारखे समाज आपला वेळ आणि त्रास वाचवण्यासाठी मोठा खर्च करून सामूहिक विवाह मेळाव्याचा मार्ग स्वीकारत आहेत. त्यांच्या परिचय मेळाव्यासाठी तर नंबर लावावा लागतो आणि पुढील मेळाव्याची वाट पाहावी लागते.

आपले कार्य किती महान आहे, याची कल्पना यावरून येते. पेरकी समाजात हा ऐतिहासिक पायंडा पाडल्याबद्दल मला नेहमीच समाधान वाटते.

सामूहिक विवाह म्हणजे केवळ पैशाची बचत नाही, तर समाजाच्या एकजुटीचे आणि सामूहिक शक्तीचे ते ज्वलंत प्रतीक आहे. हा वारसा आणि ही एकजूट कायम ठेवणे हीच आपल्या समाजासाठी सर्वात मोठी प्रेरणा आहे!

(श्री. मदन जिड्डेवार यांच्या दूरदृष्टीला आणि प्रयतनंना माझा आणि आमच्या पेरकी समाज बिजनेस ग्रुप चा विनम्र अभिवादन ! त्यांच्या शब्दांनी समाजाला एकत्र येण्याची आणि सामूहिक प्रयतनंची खरी किंमत शिकवली.)

द्वारा : प्रकाश गणपतराव गोविन्दवार नागपुर।



# 250 रुपयांचे 'नोंदणीकृत लग्न' आणि चार पुरुषार्थ !



एका कृषी भूषणचे समाज प्रबोधन!
**- ॲड. रामकृष्ण पाटील बुर्रेवार**
B.Sc (Agri.), LL.B.
कृषी भूषण (महाराष्ट्र राज्य)
ज्येष्ठ पत्रकार-देशमुख जीवन पुरस्कार प्राप्त
पत्रकारिता, देशमुख जीवन गौरव पुरस्कार प्राप्त
मो.: 9850850471, 9021487458, 9579423291
निवास पांढरकवडा यवतमाळ

'Marriages are made in Heaven and Celebrated on Earth' (लग्नाच्या गाठी स्वर्गातच बांधल्या जातात आणि पृथ्वीवर साजऱ्या केल्या जातात) असे म्हणतात. सॉक्रेटिस हे एक महान संत व विचारवंत होते. जगात त्यांच्या विचारांचा प्रभाव आहे. त्यांचे अनेक शिष्य होते. एकदा एका शिष्याला त्यांना प्रश्न विचारायचा होता - 'मी लग्न करावे की नाही?' तो शिष्य त्यांच्याजवळ बसला असताना, त्यांच्या पतनीने गरम पाणी आणून सॉक्रेटिसवर टाकले. हे पाहून तो शिष्य उठून पाय काढत निघाला.
सॉक्रेटिसने विचारले, 'परत का जात आहेस?' तेव्हा शिष्याने उत्तर दिले, 'सॉक्रेटिस, मला माझ्या प्रशनचे उत्तर मिळाले आहे.' त्यावर सॉक्रेटिसने सांगितले, 'तू लग्न कर. तुला चांगली पतनी मिळाली, तर तू सुखी होशील आणि वाईट स्वभावाची पत्नी मिळाली, तर तू विचारवंत होशील.'

आज लगनची ही संस्था जगात, मुंबई-पुण्यात मोकळीक देतच आहे. आज लिव्ह-इन-रिलेशनशिपचा जमाना आहे. ज्यात कोणतीही जबाबदारी नसते. मुलांची-कुटुंबाची जबाबदारी नसते.

चीन, जपानमध्ये तर एक मूल करण्यासाठी 70 हजार डॉलरचे अनुदान दिले जाते. मानवाच्या उत्क्रांतीमध्ये आणि प्रगतीमध्ये नीतिमत्तेची गरज म्हणून भारतीयांनी सनातन धर्मामध्ये ही स्वेच्छेने राज्ये (व्यवस्था) सुरू केली आहे.

समाजात अनाचार होऊ नये, सामाजिक मूल्यांना जतन करून समाजोपयोगी माणसाचे जीवन सुव्यवस्थित चालवण्याकरिता, लग्नाची ही त्या काळात गरजेनुसार उत्पत्ती झाली. आपल्या हिंदू तत्त्वज्ञानानुसार धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार पुरुषार्थ मानले आहेत. काम हा पुरुषार्थ दुसऱ्याशी विषयवासना उपभोगण्यासाठी नसून, आदर्श

मानलेला आहे. त्यांचे प्रजोत्पादन हासुद्धा महत्त्वाचा मुद्दा आहे. मागील पिढीला पुढील पिढीने सांभाळणे व सुख देणे हे कर्तव्य आहे. परंतु आज वृद्धाश्रमाचा जमाना आहे.

'Marriages are made in Heaven' हे खरं आहे. आपले खरे धन ही आपली मुलगी असते.

माझा मुलगा इंजिनिअर आहे, रवी पाटील. त्याला पत्नी डॉक्टर मिळाली. आमचे पुत्रही आजच्या संकल्पनांवर ठाम आहेत. 250 साली लग्न जुळले व संबंधित पत्रिकेला (मुलीकडील मंडळींना) सांगितले की, शक्यतो नोंदणीकृत लग्न (रजिस्टर मॅरेज) करायचे आहे. त्यावेळी त्यांनी ते आनंदाने मान्य केले व मी त्याचे लग्न 250 रुपयांमध्ये नोंदणीकृत केले आणि त्यानंतर कोणताही खर्च केला नाही.

याचे कारण असे की, मी नेहमीच शेती, कंपन्या व वैद्यकीय आयुर्वेद शक्तीचे मार्गदर्शन केले आहे आणि त्यांना शेतीसोबत आर्थिक शिस्तीचे मार्गदर्शन केले आहे. तुटपुंज्या शेतीत मोठे विवाह सोहळे व मोठे वारसदार बघू नयेत, असे मी सांगितले. हल्ली शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती बेकायदेशीर (अत्यंत नाजूक) आहे, हे त्यांना समजावले. त्यामुळे मोठ्या खर्चाचे ओझे सोसण्याऐवजी, समाजापुढे एक आदर्श म्हणून माझ्या मुलाचा विवाह 250 रुपयांत नोंदणीकृत केला.

मुलीच्या सासरकडील लोक दुसरे (लक्झरी) विचारत असूनही मला मुलीचे लग्न नागपूरला सेंटर पॉईंट हॉटेलमध्ये करावे लागले (केले). तरीही त्यांची इच्छा होती.

आमच्या समाजाने शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक प्रगती केली आहे, परंतु दुसऱ्या समाजाच्या तुलनेत आपण पाहिल्यास मागे आहोत. म्हणून, वरील विचारांचा आत्मसात करून, आवश्यकतेनुसार कल्पनांना फाटा देण्यात यावा, ही विनंती.

आपल्या विवाह विशेषांकाला माझ्या लाख लाख शुभेच्छा!



# अंतरजातीय विवाह समाजाला एक शाप !



**संदीप लक्ष्मणराव गेटकेवार**
मुख्याध्यापक, माध्यमिक आश्रम शाळा कमळेवाडी
ता. मुखेड जि. नांदेड, 93703 14345

भारतीय समाज हा शतकानुशतके विविध जाती, धर्म आणि परंपरांनी विणलेला आहे. प्रत्येक जातीचे आपले विशिष्ट नियम, प्रथा आणि मर्यादा आहेत. या मर्यादांमुळे समाजात एक प्रकारची व्यवस्था निर्माण झाली आहे. परंतु आधुनिक काळात शिक्षण, स्वातंत्र्य आणि समानतेच्या विचारांनी या परंपरांना आव्हान दिले आहे. त्यातूनच अंतरजातीय विवाहांची संकल्पना पुढे आली.

अंतरजातीय विवाह म्हणजे वेगवेगळया जातींतील दोन व्यक्तींनी परस्पर प्रेमाने विवाह करणे. या विवाहाकडे काही लोक समाजाच्या प्रगतीचा टप्पा म्हणून पाहतात; परंतु अजूनही मोठ्या प्रमाणावर समाजातील पारंपरिक विचारसरणी याला स्वीकारत नाही. अनेकांच्या मते, असा विवाह हा समाजाच्या स्थैर्याला आणि संस्कृतीला धक्का देणारा 'शाप' आहे.

अशा विवाहामुळे अनेक वेळा कुटुंबातील ऐक्य तुटते. पालकांचा अपमान होतो, नात्यांमध्ये कटुता निर्माण होते. काही ठिकाणी तर अशा विवाहांमुळे हिंसाचार, बहिष्कार किंवा सन्मानहत्याही झालेल्या दिसतात. समाजातील रूढी आणि प्रथा मोडल्यामुळे परंपरावादी लोक याला विरोध करतात. त्यांना वाटते की, या विवाहांमुळे जातव्यवस्थेतील संतुलन बिघडेल आणि सामाजिक रचनेत गोंधळ निर्माण होईल.

तसेच, अशा विवाहांमध्ये संस्कृती, परंपरा, जीवनशैली आणि विचारातील फरकांमुळे मतभेद निर्माण होऊ शकतात. काही वेळा दोघांच्या कुटुंबांमधील सामाजिक व आर्थिक विषमता देखील वैवाहिक जीवनात अडथळा आणते. त्यामुळे अशा विवाहांना टिकवून ठेवणे कठीण ठरते, हेही वास्तव आहे.

म्हणून अनेकांच्या दृष्टीने अंतरजातीय विवाह हा समाजासाठी एक शापच ठरतो. कारण तो समाजातील जुन्या रचनेवर आणि परंपरांवर आघात करतो. जेव्हा समाज अजून पूर्णपणे आधुनिक विचारांकडे झुकलेला नाही, तेव्हा अशा बदलांना सहज स्वीकारणे कठीण जाते.

तथापि, हेही खरे आहे की, काळ बदलतो आणि विचारही बदलतात. आज जे समाजाला 'शाप' वाटते, ते उद्या समाजासाठी 'वरदान' ठरू शकते. पण सध्याच्या पारंपरिक दृष्टीकोनातून पाहिले, तर अंतरजातीय विवाह समाजात मतभेद आणि असंतोष निर्माण करणारा एक प्रकारचा शापच मानला जातो.

# वेडिंग प्लानरच्या मदतीने बजेटमध्ये लग्न कसे करावे !



**- श्री लोकेश राजेश मालेवार**
वेडिंग प्लानर, जबलपुर
मोबाइल - 89648 88925

लग्नाची योजना बनवणे हे एक मोठे आणि तणावपूर्ण काम असू शकते, खासकरून जेव्हा खर्चाला मर्यादा असते. अशा वेळी, एक चांगला वेडिंग प्लानर तुम्हाला मदत करू शकतो. लोकांना वाटते की वेडिंग प्लानर ठेवल्याने खर्च वाढतो, पण खरं तर ते तुमचा खर्च कमी करून लग्नाचे योग्य नियोजन करू शकतात.

**वेडिंग प्लानर बजेटमध्ये कशी मदत करतात ?**

● **उत्कृष्ट विक्रेत्यांची (Vendors) निवड :** वेडिंग प्लानर्सना बाजारातील सर्वोत्तम विक्रेत्यांची माहिती असते. ते तुमच्या बजेटनुसार चांगल्या दर्जाचे केटरर्स, डेकोरेटर्स, फोटोग्राफर्स आणि इतर सेवा पुरवठादार निवडू शकतात. अनेकदा मोठ्या प्रमाणात बुकिंग करत असल्याने त्यांना चांगले डिस्काउंट्स मिळतात, ज्यामुळे तुमचा खर्च कमी होतो.

● **योग्य बजेटिंग :** वेडिंग प्लानर तुम्हाला वास्तविक बजेट तयार करण्यास मदत करतात. ते प्रत्येक खर्चाचा तपशील तयार करतात आणि अनावश्यक खर्चांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करतात. यामुळे तुम्ही ठरवलेल्या मर्यादेतच खर्च करू शकता.

● **अनावश्यक खर्चांवर नियंत्रण :** लगनच्या तयारी दरम्यान अनेकदा अनावश्यक खर्च होतात. वेडिंग प्लानर असे खर्च ओळखू शकतात आणि ते टाळण्याचे मार्ग सुचवू शकतात. उदाहरणार्थ, जर तुम्ही महागड्या फुलांची निवड केली असेल, तर ते तुम्हाला त्याच रंगाचे, पण कमी किमतीचे पर्याय सुचवू शकतात.

● **वेळेचे नियोजन :** योग्य वेळेचे नियोजन केल्यास अनेक खर्च वाचतात. वेडिंग प्लानर सर्व कामांची योजना बनवतात, ज्यामुळे ऐनवेळेची गडबड आणि त्यासाठी लागणारा अतिरिक्त खर्च टाळता येतो. ते सर्व गोष्टींची आधीच तयारी करतात, ज्यामुळे सर्व सुरळीत पार पडते.

● **संपूर्ण व्यवस्थापन :** वेडिंग प्लानर संपूर्ण व्यवस्थापनाची जबाबदारी घेतात. यामुळे तुम्हाला आणि तुमच्या कुटुंबाला लग्नाच्या दिवसाचा आनंद घेण्याची संधी मिळते. तुम्हाला छोट्या-छोट्या गोष्टींची चिंता करण्याची गरज नसते.

# लग्नाआधी रक्त तपासणी का आवश्यक आहे



- **डॉ. स्वप्नील ईश्वर बाकमवार**
एम डी श्वसन रोग विशेषज्ञ
नागपुर

लग्न हा जीवनातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. आयुष्यभराच्या नात्याची सुरुवात करताना भावनिक, सामाजिक व आर्थिक तयारीसोबतच शारीरिक व मानसिक आरोग्याची तयारीही तितकीच महत्त्वाची असते.

आरोग्य तपासणी ही केवळ आजार शोधण्यासाठी नसून, भविष्यातील कुटुंबासाठी सुरक्षित पाया घालण्याचा एक मार्ग आहे.

**● लग्नाआधी रक्त तपासणीचे महत्त्व !**

1. अनुवांशिक आजार रोखणे - थॅलेसिमिया, सिकल सेल ॲनिमिया यांसारखे आजार आईवडिलांमधून मुलांमध्ये जातात. जर दोन्ही जण कॅरियर असतील तर पुढच्या पिढीत गंभीर आजार होऊ शकतो.

2. संसर्ग टाळणे - HIV, हिपॅटायटिस, सिफिलिस असे आजार एकमेकांमध्ये पसरू शकतात आणि गर्भधारणेत बाळालाही होऊ शकतात.

3. गर्भधारणेची सुरक्षितता - Rh निगेटिव्ह / पॉझिटिव्ह गट माहिती असल्यास गर्भधारणेत येणाऱ्या गुंतागुंती टाळता येतात.

4. सामान्य आजारांची जाणीव - रक्ताल्पता, मधुमेह, थायरॉईड यांसारखे आजार आधीच कळले तर योग्य वेळेत उपचार करून विवाहानंतरचे जीवन सुलभ होते.

**करावयाच्या महत्त्वाच्या तपासण्या !**

**1 ) रक्तगट व Rh फॅक्टर**

भविष्यात गर्भधारणा सुरक्षित होण्यासाठी गरजेचे. Rh incompatibility असल्यास डॉक्टर योग्य औषधांनी समस्या टाळू शकतात.

2) **कम्प्लीट ब्लड काउंट (CBC)**

यातून हिमोग्लोबिन, पांढऱ्या रक्त पेशी, प्लेटलेट्स वगैरे मोजले जातात. ॲनिमिया, संसर्ग किंवा रक्त विकार ओळखता येतात.

### 3) हिमोग्लोबिन इलेक्ट्रोफोरेसिस

थॅलेसिमिया व सिकल सेल ॲनिमिया यांचे कॅरियर स्टेटस कळते. हे तपासणे विशेषतः महाराष्ट्र, विदर्भ, छत्तीसगड, बंगाल इ. भागात फार महत्वाचे आहे.

### 4) संसर्गजन्य आजार तपासणी

- HIV I & II
- हिपॅटायटिस B (HBsAg)
- हिपॅटायटिस C (Anti-HCV)
- सिफिलिस (VDRL टेस्ट)

हे आजार लवकर कळले तर उपचार शक्य होतात आणि पुढे साथीदार व बाळ दोघेही सुरक्षित राहतात.

### 5) ब्लड शुगर व थायरॉईड प्रोफाईल

लपलेला मधुमेह किंवा थायरॉईड विकार असल्यास तो विवाहानंतरच्या गर्भधारणेवर परिणाम करू शकतो.

### ● अतिरिक्त तपासण्या (गरजेनुसार) !

**रुबेला IgG ॲंटिबॉडी -** महिलेला आधीपासून प्रतिकारशक्ती आहे का हे कळते. नसेल तर लस घेऊन बाळाला जन्मजात संसर्गापासून सुरक्षित ठेवता येते.

**STI तपासण्या -** गरजेनुसार लैंगिक संसर्गजन्य आजारांसाठी.

**फर्टिलिटी व हार्मोनल तपासण्या -** काही जोडप्यांना लग्नआधीच ही माहिती करून घ्यायची असेल !

लग्नाआधी केलेल्या या तपासण्या केवळ आजार शोधण्यासाठी नसून निरोगी वैवाहिक आयुष्य आणि पुढील पिढीचे आरोग्य सुरक्षित करण्यासाठी आहेत.

हे तपास करणे ही काळाची गरज आहे आणि आरोग्यपूर्ण नात्याचा पाया आहे.



# लग्नाआधी वधू-वरांनी एकमेकांना जाणून घेणे खूप महत्त्वाचे आहे! एकमेकांची आवड, उद्दिष्टे आणि विचार जाणून घेतल्याशिवाय विवाह शक्य नाही !



**- अभिषेक कविता प्रकाश गोविंदवार,**
नागपूर

दोन्ही कुटुंबे वधू-वरांना एकमेकांना भेटण्याची आणि बोलण्याची संधी कशी देतात, यावरच पुढचे नातेसंबंध अवलंबून असतात. ही जेन-झेड पिढी आहे. एकमेकांना जाणून घेतल्याशिवाय निणऱ्य घेणे मूर्खपणाचे ठरेल. एकमेकांसोबत 'कंफर्टेबल' वाटणे आवश्यक आहे. दोघांचे विचार जुळायला पाहिजेत. दोघांच्या आवडी-निवडी जुळणे आवश्यक आहे. जर लग्न समाजात ठरवले जात असेल आणि आधीची कोणतीही ओळख नसेल, म्हणजेच 'अरेंज्ड मॅरेज' असेल, तर काय करावे ?

नाते निश्चित करण्याच्या औपचारिकतेनंतर सामान्यतः वधू-वरांना एकमेकांशी बोलण्याची संधी मिळते. मोबाईलमुळे हे काम सोपे झाले आहे. लगनआधी एकमेकांना समजून घेण्याची संधी मिळते. जर सर्व काही ठीक वाटले, तरच लग्न करावे ! अन्यथा वेगळे होण्याचे मार्ग खुले आहेत. खराब नात्यात अडकण्यापेक्षा अविवाहित राहणे कधीही चांगले.

वधू-वरांनी एकमेकांना व्यक्तिशः भेटावे, जेणेकरून ते एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेऊ शकतील. या भेटींमध्ये ते त्यांचे विचार, आवडी-निवडी आणि जीवनातील उद्दिष्टांबद्दल बोलू शकतात.

वधू-वरांनी एकमेकांच्या कुटुंबाबद्दल माहिती मिळवावी. जसे की कुटुंबातील सदस्य, कौटुंबिक मूल्ये आणि परंपरा. यामुळे त्यांना एकमेकांच्या कौटुंबिक पार्श्वभूमीबद्दल जाणून घेण्यात मदत मिळेल. हे जाणून घेण्यासाठी सगाई आणि लग्नाच्या मधील मिळणारा वेळ ही एक संधी असते.

वधू-वरांनी एकमेकांच्या जीवनशैली आणि सवयींबद्दल माहिती मिळवावी, जसे की खाण्यापिण्याची आवड, राहणीमान आणि मनोरंजनाची आवड. यामुळे त्यांना एकमेकांशी जुळवून घेण्यास मदत होईल.

वधू-वरांनी एकमेकांच्या आर्थिक परिस्थिती आणि उद्दिष्टांबद्दल माहिती मिळवावी, जसे की उत्पन्न, खर्च आणि भविष्यातील आर्थिक योजना. यामुळे त्यांना एकमेकांशी आर्थिकदृष्ट्या जुळवून घेण्यास मदत होईल.

वधू-वरांनी एकमेकांच्या भावनिक आणि मानसिक आरोग्याबद्दल माहिती मिळवावी.

ही पावले उचलून, वधू-वर एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेऊ शकतात आणि त्यांचे नाते अधिक मजबूत बनवू शकतात. यामुळे नातेसंबंध जोडले जाऊ शकतात.

# घर-संसार आणि परिवार !
# हे त्याग, बलिदान आणि आत्म-विकासाची गाथा आहे भारतीय संस्कृतीत !



- **कविता प्रकाश गोविन्दवार**
नागपुर

भारतीय संस्कृतीत 'घर-संसार' ही संकल्पना केवळ एका कुटुंबापुरती मर्यादित नाही, तर ती त्याग, समर्पण आणि परस्पर संबंधांवर आधारित एक जीवनशैली आहे. आजच्या काळात जेव्हा प्रत्येकजण 'स्वतःसाठी जगणे' या विचाराकडे आकर्षित होत आहे, तेव्हा 'घर-संसार' ही संकल्पना अधिकच महत्त्वाची ठरते. कारण, स्वार्थाने जगणे हे फक्त प्राणी करू शकतात, पण माणूस म्हणून आपले कर्तव्य इतकेच मर्यादित नाही.

'घर-संसार' म्हणजे केवळ घरात राहणे नव्हे, तर घरातल्या प्रत्येक व्यक्तीची काळजी घेणे, त्यांच्या गरजा समजून घेणे आणि त्यांच्या आनंदासाठी स्वतःच्या इच्छांचा त्याग करणे. हे एक असं बंधन आहे जे आपल्याला स्वार्थापासून दूर ठेवून समाजाभिमुख बनवते. यात पती-पतनीचे नाते, मुलांचे संगोपन, आई-वडिलांची सेवा आणि कुटुंबातील प्रत्येक सदस्याच्या सुख-दुःखात सहभागी होणे समाविष्ट आहे.

स्वार्थ विरुद्ध त्यागः माणसाचे खरे स्वरूप आहे !

तुम्ही म्हणता त्याप्रमाणे, स्वार्थी बनून केवळ प्राणी जगू शकतात. कारण त्यांचे जगणे केवळ त्यांच्या मूलभूत गरजा (अन्न, पाणी, निवारा) पूर्ण करण्यापुरते मर्यादित असते. पण माणूस हा सामाजिक प्राणी आहे.

आपल्यात प्रेम, करुणा, सहानुभूती आणि त्याग करण्याची क्षमता आहे. जेव्हा आपण आपल्या कुटुंबासाठी, समाजासाठी किंवा इतरांसाठी काही करतो, तेव्हाच आपल्याला खऱ्या आनंदाची अनुभूती होते.

● **बलिदानाचे महत्त्व :** घर-संसारात अनेकदा मोठी किंमत मोजावी लागते. अनेकदा आपल्याला आपल्या करियरच्या संधी, वैयक्तिक छंद किंवा स्वातंत्र्याचा त्याग करावा लागतो. पण हे बलिदान व्यर्थ जात नाही. त्यातून एक मजबूत कुटुंब तयार होते, जे भविष्यातील पिढ्यांसाठी एक आदर्श बनतो.

आजच्या जगात 'मी' आणि 'माझे' या विचारांवर भर दिला जातो. पण या स्वार्थी विचारांमुळेच अनेक लोक एकटे आणि दुःखी आहेत. घर-संसार आपल्याला या एकाकीपणातून बाहेर काढते. हे आपल्याला शिकवते की आनंदी राहण्यासाठी केवळ स्वतःचा विचार करणे पुरेसे नाही, तर इतरांच्या आनंदात आपला आनंद शोधणे आवश्यक आहे.

'घर-संसार' आपल्याला हेच शिकवते की खरी श्रीमंती पैशात नसून, नात्यांमध्ये आणि इतरांच्या आनंदासाठी केलेल्या त्यागात आहे. म्हणूनच, माणूस म्हणून आपण केवळ जगू नये, तर एक अर्थपूर्ण जीवन जगावे.

# सून नव्हे ! आमची लेकच ! लावून दिला पुनर्विवाह !
# पेरकी समाजात एक उत्तम उदाहरण !

**- श्री प्रकाश पारो गणपतराव गोविन्दवार**

नागपुर


लोकमत

जगण्याला मिळाली नवी दिशा : लिंगनवार कुटुंबाचा समाजापुढे आदर्श

**सून नव्हे आमची लेकच, लावून दिला पुनर्विवाह**

समाजाला योग्य दिशा दाखवण्यासाठी काही व्यक्ती केवळ बोलत नाहीत, तर स्वतःच्या कृतीतून एक आदर्श घालून देतात. यवतमाळ येथील डॉ. रमेश नागोराव लिंगनवार हे अशाच एका दुर्मिळ व्यक्तिमत्वाचे उदाहरण आहेत. त्यांनी आपली सून, जी आपल्या मुलाच्या अकाली निधनानंतर विधवा झाली होती, तिला आपली मुलगी मानून तिचा पुनर्विवाह लावून दिला. हा निर्णय केवळ एक कौटुंबिक घटना नाही, तर पेरकी समाजातच नव्हे, तर संपूर्ण समाजात एक मोठी सामाजिक क्रांती घडवणारी घटना आहे.

दुःखातून जन्माला आलेली प्रेरणा. दोन वर्षांपूर्वी डॉ. लिंगनवार यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला, जेव्हा त्यांच्या एकुलत्या एक मुलाचे अकाली निधन झाले. मुलाच्या मृत्यूने त्यांच्या घरात दुःख आणि निराशा पसरली. अशा परिस्थितीत, त्यांच्यासमोर त्यांच्या सुनेचे आणि नातवाचे भविष्य उभे होते. अनेकजण या दुःखाला कुरवाळत बसले असते, पण डॉ. लिंगनवार यांनी आपल्या शोकाला बाजूला ठेवून एक धाडसी निणऱ्य घेतला. त्यांनी आपल्या सुनेला परत तिचे आयुष्य सुरू करण्याची संधी दिली.

त्यांनी केवळ आपल्या सुनेचा पुनर्विवाह करण्याचा विचार केला नाही, तर तो अत्यंत सन्मानाने पार पाडला. त्यांनी त्यांच्या सुनेसाठी एक योग्य वर शोधला, जो तिच्या भूतकाळाचा आदर करेल. आजच्या काळात, पुनर्विवाहासाठी तयार असलेल्या मुला-मुलींची संख्या कमी आहे, विशेषतः जर ती व्यक्ती विधवा किंवा घटस्फोटित असेल. पण,

डॉ. लिंगनवार यांनी समाजाच्या या मानसिकतेला आव्हान दिले.

**आपल्या सुनेचा पुनर्विवाह मोठ्या थाटामाटात, आपल्या मुलीप्रमाणे केला.**

**केवळ विवाहच नव्हे, तर सन्मानाचे हस्तांतरण**

या प्रसंगात सर्वात मोठी गोष्ट म्हणजे, त्यांनी आपल्या दिवंगत मुलाची सर्व मालमत्ता आणि सोने आपल्या सुनेला हस्तांतरित केले. हा निणऱ्य केवळ आर्थिकच नाही, तर नैतिक आणि भावनिकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. यातून त्यांनी समाजाला एक संदेश दिला की, स्त्रीला केवळ एक वस्तू मानू नये, तर तिला समान मान-सन्मान आणि अधिकार द्यावेत.

पेरकी समाजातील काही प्रभावशाली आणि प्रतिष्ठित लोकही भूतकाळात आपल्या मुलींचा पुनर्विवाह करू शकले नाहीत. पण डॉ. लिंगनवार यांनी त्यांच्या घरूनच या बदलाची सुरुवात केली. म्हणूनच त्यांना संपूर्ण पेरकी समाजात सर्वात मोठा समाजसेवक म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कारण, खरी समाजसेवा ही घरातूनच सुरू होते.

समाजासाठी एक आव्हान आणि प्रेरणा आजच्या आधुनिक काळात घटस्फोट आणि पुनर्विवाह सामान्य होत आहेत, पण आजही अनेक लोक याला सामाजिक अपमानाचे कारण मानतात. ते आपल्या मुलांना योग्य जीवनसाथी शोधण्यात मदत करत नाहीत, आणि त्यांचे प्रश्न लपवून ठेवतात.

डॉ. लिंगनवार यांनी हे दाखवून दिले की, पुनर्विवाह ही सामान्य आणि आवश्यक गोष्ट आहे.

गुजराती समाजात पुनर्विवाह सहजतेने स्वीकारला जातो, तसाच विचार पेरकी समाजानेही स्वीकारणे गरजेचे आहे. डॉ. लिंगनवार यांनी त्यांच्या कृतीतून एक मजबूत पायंडा पाडला आहे. त्यांचे हे कार्य पाहून इतर लोकांनीही त्यांच्या मार्गावर चालावे अशी आशा आहे. ही कथा वाचल्यावर अनेक लोक या कार्याची प्रशंसा करतील, पण खरी गरज त्यांच्या विचारांना आपल्या आयुष्यात उतरवण्याची आहे.

आपल्यासारख्या महान व्यक्तींमुळेच आपला समाज पुढे जातो.


यवतमाल जिला

विधवा बहू को बेटी मानकर कराया पुनर्विवाह

# प्रेम विवाहाला समर्थन द्यावे की नाही ?


- श्री प्रकाश पारो गणपतराव गोविन्दवार

नागपुर




महाराष्ट्र टाइम्स नागपुर । मंगळवार, २४ डिसेंबर २०२४

प्रकाश गोविंदवार, नागपुर

## प्रेमविवाहाला समर्थन द्यावे की नाही?

माझेही मत

**महाराष्ट्र टाइम्सने माझ्या या लेखाचे खूपच सुंदर आणि आकर्षक भाषांतर केले आहे. यासाठी मी महाराष्ट्र टाइम्स नागपुर अखबार संपादक श्रीपाद अपराजित जी यांचा खूप खूप धन्यवाद आणि आभार व्यक्त करतो.**

हा एक यक्षप्रश्न आहे की कुटुंबाने आपल्या मुला-मुलीच्या प्रेमविवाहाला समर्थन देऊन त्याच्यासोबत उभे राहायला हवे की नाही ?

किंवा त्या मुला-मुलीला त्यांच्या इच्छेच्या विवाहात एकटे सोडून द्यायला हवे ?

जेणेकरून ते आपले घर-संसार गांभीर्याने घेतील. विवाहाचे पालन करण्यासाठी नेहमी प्रोत्साहित राहतील. घटस्फोटाची वेळ लवकर येणार नाही! असे पाहण्यात आले आहे की प्रेमविवाह अयशस्वी होण्याचे प्रमाण खूप जास्त आहे!

याबद्दल कोणाला शंका असल्यास, त्यांनी फॅमिली कोर्टात जाऊन पाहावे.

कशाप्रकारे लहान वयाच्या माता लहान मुलांना कडेवर घेऊन तासन्तास कोर्टात उभ्या राहतात.

ही गोष्ट देश आणि समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

प्रेमविवाहाच्या बाबतीत कुटुंबाने आपल्या मुला-मुलींच्या समर्थनात उभे राहायला हवे की नाही ?

याचे उत्तर 'होय' असेही असू शकते! किंवा 'नाही' असेही असू शकते! परिस्थिती काहीही असो!

याचे तीन खाजगी अनुभवाचे उदाहरणे उपलब्ध आहेत!

एक माझ्या सख्ख्या संबंधात तीस वर्षांपूर्वी एका मुलीने आपल्या मर्जीने आंतरजातीय विवाह केला होता. जो एकप्रकारे प्रेमविवाह होता. त्या प्रेमविवाहाचे एक कारण हुंडा पद्धत (दहेज प्रथा) देखील होती. कुटुंबाकडे हुंडा देण्यासाठी पुरेसा पैसा नव्हता.

हे जाणून त्या मुलीने आपल्या सहकाऱ्यासोबत प्रेमविवाह केला. मी तिच्या समर्थनात उभा होतो. तिची साथ सोडली नव्हती. आजही ती मला राखी पाठवते.

तर तिचे संपूर्ण कुटुंब तिच्या विरोधात होते. तिच्या कुटुंबाने तिच्याशी सर्व संबंध तोडले होते. आजही तीच परिस्थिती आहे.

एका वर्षाच्या आत त्या मुलीवर दुःखाचा डोंगर कोसळला. त्या नवविवाहितेच्या पतीला (लडके को) ॲट्रोसिटीच्या केसमध्ये जेल झाली. अशा परिस्थितीतही ती मुलगी त्याच घरात एकटी राहिली. आपल्या पतीची साथ सोडली नाही.

त्या मुलीनेही आपल्या कुटुंबाकडून कोणतीही मदत घेतली नाही आणि तिच्या कुटुंबानेही कोणतीही मदत केली नाही. फक्त मी तिला आत्मनिर्भर बनवण्यासाठी एक शिलाई मशीन विकत घेऊन दिली होती. शिवणकाम करून तिने आपले भरणपोषण केले. त्याच आधारावर तिने पहिली पाच वर्षे एका मुलीसोबत आपल्या पतीच्या घरी काढली.

या दरम्यान तिने डेली वेजेसवर नगरपालिकेत नोकरी मिळवली होती. आपल्या संघर्षात ती एकटी होती. सुमारे पाच वर्षांनी तो मुलगा (पती) निदोष (बा इज्जत) मुक्त झाला. आजही या दोघांची जोडी कायम आहे. सध्या माझ्या नात्यातील ती मुलगी नगरपालिकेत क्लास टूच्या पोस्टवर अधिकारी आहे. लवकरच सेवानिवृत्त होईल. आनंदाची गोष्ट आहे की ती सुखी आणि समृद्ध जीवन जगत आहे.

दुसरे एक उदाहरण माझ्या एका करोडपती मित्राचे आहे. नागपुरात दोन एकर जमीन आणि काही खाली प्लॉट आहेत. सुमारे पंचवीस-तीस कोटी रुपयांची मालमत्ता आहे. रोकडही भरपूर आहे. आलिशान बंगला आहे. त्यांच्या दोन्ही मुली आयटी इंजिनियर आहेत.

दोन्ही मुलींनी आपल्या मर्जीनुसार लग्न केले. त्यांचे कुटुंब त्यांच्या

प्रेमविवाहाला पाठिंबा देणारे होते. लग्न मोठ्या थाटामाटात केले. लगनत चांगलाच पैसा खर्च केला.

पहिल्या मुलीचा काही कारणामुळे प्रेमभंग झाला. एका लहान मुलीसोबत तिने पतीपासून घटस्फोट घेऊन आपल्या आई-वडिलांच्या घरी परत आली. दुसऱ्या मुलीसोबतही तेच झाले. तिचाही प्रेमभंग झाला. तीही एकटी आहे.

दोघीही आपल्या आई-वडिलांची सेवा करत आहेत.

मित्र असल्यामुळे मी आणि त्यांचे इतर नातेवाईक त्या दोन्ही मुलींसाठी त्यांच्या समाजात पुनर्विवाहासाठी खूप प्रयत्न केले. गरीब सुशिक्षित मुलांना धन-संपत्तीचे आमिषही दाखवले. परंतु त्या दोन्ही मुलींसाठी योग्य वर शोधण्यात आम्ही अयशस्वी ठरलो.

आज मुलींचे वय चाळीस वर्षांहून अधिक झाले आहे. दोघींनीही लगनची आशा सोडली. आज त्या मोठ्या बंगल्यात माझे मित्र, त्यांची पत्नी, त्यांच्या दोन्ही मुली आणि नात राहतात. एक छोटासा पामोलिव्ह कुत्राही आहे. कुटुंब त्याच्यासोबत खेळत राहते.

आज कधी कधी खूप दुःखी मनाने माझे ते मित्र म्हणतात. मी माझ्या दोन्ही मुलींच्या प्रेमविवाहाला समर्थन द्यायला नको होते. त्यांना एकटे सोडायला हवे होते. तसे झाले असते तर दोन्ही मुलींनी आपला प्रेमविवाह निभावला असता. लग्न सहज तुटले नसते.

मुली त्यांच्या आयुष्यात एकट्या राहिल्या नसत्या. घटस्फोटाची वेळ आली नसती. असे माझ्या करोडपती मित्राचे म्हणणे आहे.

असाच एक किस्सा आहे, माझ्या आणखी एका मित्राचा. ते कुणबी मराठा समाजाचे आहेत. ते माझ्यापेक्षा वीस वर्षांनी मोठे आहेत. लेखन कार्यामुळे माझा परिचय आहे. आज ते माझे चांगले मित्र आहेत. त्यांनीही आपल्या एकुलत्या एका मुलीचा प्रेमविवाह मोठ्या थाटामाटात केला होता. पाच दिवस विवाह समारंभ चालला होता.

अमरावती शहराला लागून असलेली महागडी शेती विकून नागपुरात एक मोठे कॉलेज जावयाला भेट दिले. जावई आणि त्यांची मुलगी उच्चशिक्षित आहेत.

सध्या त्याच जावयाने आपल्या कॉलेजच्या एका सुंदर महिला लेक्चररच्या नादात त्या मुलीला घटस्फोट दिला आहे. तर त्यांची दोन्ही मुले विवाहायोग्य आहेत.

ऐंशी वर्षांच्या वयात ते दोन्ही आई-वडील खूप दुःखी आहेत. ते त्यांच्या समाजातील खूपच प्रतिष्ठित व्यक्ती आहेत. समाजकार्यात रुची ठेवतात.

तर त्यांच्या समाजाने त्यांना समाजातून एकप्रकारे बाहेर काढले होते.

समाजाच्या मोठ्या पदावरून हटवले होते. हे सांगून की, जो माणूस आपले कुटुंब सांभाळू शकला नाही. तो समाजाला काय सांभाळणार?

तर ही गोष्ट खरी आहे. जो आपल्या मुलांना सांभाळू शकला नाही. तो समाजाला काय सांभाळणार! कोणती समाजसेवा करणार? समाजाला कोणती अशी नवी प्रेरणा देणार? कोणता चांगला आदर्श ठेवणार?

आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणाऱ्या लोकांची समाजाला गरज नाही. असे म्हणून माझ्या या मित्राला समाजाच्या उच्च पदावरून हटवले होते.

अशा लोकांनी निश्चितपणे स्वतःला आपल्या समाजापासून दूर ठेवायला हवे.

त्यांच्या एकुलत्या एका मुलीने प्रेमविवाह केल्यामुळे त्यांना आपल्या समाजात मान-सन्मानाला मुकावे लागले होते. सध्या मुलीच्या घटस्फोटामुळे उरलेली इज्जतही संपली आहे. तर त्यांनी हे सर्व आधुनिक विचारांचे असल्यामुळे केले होते. आपल्या एकुलत्या एक अपत्याच्या प्रेमविवाहाला समर्थन दिले होते.

या तिन्ही अनुभवांवरून मला व्यक्तिगतरीत्या असे वाटते की, प्रेमविवाहाच्या बाबतीत मुला-मुलींना एकटे सोडून द्यायला हवे. कुटुंबाने त्यांच्या समर्थनात उभे राहायला नको. उलट विरोध दाखवायला हवा. काही वर्षांसाठीच का असेना. जेणेकरून त्या नवविवाहित जोडप्यावर निभावण्याचा दबाव त्यांची मुले मोठी होईपर्यंत कायम राहील.

नाहीतर अनेकदा प्रेमविवाहात छोट्या छोट्या कारणांमुळे प्रकरणे घटस्फोटापर्यंत पोहोचतात. मुलांचा पुनर्विवाह सहज होतो. परंतु मुलींचा पुनर्विवाह होऊ शकत नाही. अशा घटस्फोटित मुलींची खूप मोठी संख्या सर्वच समाजांमध्ये आहे. ज्या माझ्या मित्र यांच्या मुलींसारख्या पुनर्विवाहाच्या प्रतीक्षेत वृद्ध होत आहेत.

आज सध्या देशातील सर्व न्यायालयांमध्ये नव्वद टक्के घटस्फोटाची प्रकरणे प्रेमविवाहाशी संबंधित आहेत. या गोष्टीची मुलांना माहिती करून देणे आवश्यक आहे. मुलांवर संस्कार करणे आवश्यक आहे.

सामाजिक बंधनात राहून होणाऱ्या विवाहामध्ये घटस्फोटाची वेळ कमी येते. कशाप्रकारे तरी निभावून घेतले जाते. कुटुंब आणि समाजाचा दबावही काम करतो. कोणतेही कुटुंब आणि समाज कुटुंबाला तुटताना पाहू इच्छित नाही. त्यामुळे समाज अंतर्गत अरेंज मॅरेजच्या (ठरवून केलेल्या विवाहाच्या) यशाचा दर जास्त आहे. मग ते डॉक्टर असो, इंजिनियर असो किंवा दुसऱ्या व्यवसायाचे. प्रेमविवाहात कुटुंब विस्कळीत होण्याचे आणि घटस्फोटाचे प्रमाण निश्चितच खूप जास्त आहे.

याबद्दल कोणाला शंका असल्यास, त्यांनी फॅमिली कोर्टात जाऊन पाहावे. माता लहान मुलांना कडेवर घेऊन उभ्या राहतात.

या सगळ्याच्या बावजूदही समाजात प्रेमविवाह कमी होऊ शकत नाहीत. याचे कारण स्वातंत्र्य आहे. विवाहाशिवाय एकत्र राहण्याची सूट आहे. समाजात वाढणारी स्वैराचारिताही आहे. शिक्षणामध्ये नैतिकतेची (मोरॅलिटीची) कमतरता. नैतिक मूल्यांचा ऱ्हास.

माझ्या माहितीनुसार प्रेमविवाहाची संख्या वाढल्यामुळे अनेक समाजांमध्ये मुलांसाठी विवाहायोग्य मुलींची कमतरता झाली आहे. अरेंज मॅरेजसाठी योग्य मुली मिळत नाहीत.

सर्वात जास्त दुःखाची गोष्ट आहे की समाजात विवाहायोग्य सुंदर, अतिसुंदर मुलींची कमतरता झाली आहे. सुंदर मुली दुसऱ्या जाती-समाजात लग्न करतात. यामुळे समाजातील विवाहायोग्य मुलांना सुंदर मुली मिळत नाहीत. मग ते सुंदर मुलींच्या शोधात दुसऱ्या जाती-धर्मात लग्न करतात. ही एक न्यूक्लियर चेन रिएक्शनसारखी आहे, जसा ॲटम बॉम्बमध्ये अणू स्फोट करतो.

माझ्या एका महाराष्ट्रीयन ब्राह्मण लोकमतच्या पत्रकार मित्राने मला सांगितले की ते खूप नशीबवान आहेत. गरीब असूनही त्यांना त्यांच्या जाती-बिरादरीत मुलगी मिळाली. अन्यथा आमच्या ब्राह्मण समाजात मुलांना त्यांच्या समाजात मुली मिळत नाहीत.

बहुतांश नोकरी करणाऱ्या सुशिक्षित मुली दुसऱ्या समाजातील मुलांसोबत प्रेमविवाह करत आहेत.

अशात महाराष्ट्रातील ब्राह्मण समाज संपण्याच्या मार्गावर आहे. असा धोका हिंदू धर्मातील सर्वच समाजांवर आहे. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, जेव्हा जातीत रोटी-बेटीचा व्यवहार होत नाही. तेव्हा जात-समाज तुटतो. जेव्हा जात-समाज तुटतो. तेव्हा धर्मही तुटतो. हिंदू धर्माचा पाया त्याच्या लहान-लहान जाती आहेत. लहान-लहान घटक जुळल्याने समाज आणि धर्म बनतो. हिंदू धर्माच्या पायात अगणित लहान-लहान जाती आहेत. ज्या त्याला धार्मिकरित्या सक्षम आणि मजबूत बनवतात.

जपान आणि कोरिया याचे उत्तम उदाहरण आहेत. तिथे विवाह संस्था तुटल्यामुळे युवा पिढी बौद्ध धर्म सोडत आहे. युवा वर्ग बुद्ध विहारात जात नाही. मोठे-मोठे

विशाल बुद्ध विहार रिकामे पडले आहेत. बुद्ध विहारात फक्त वृद्ध दिसतात. यामुळे त्यांना आपला बौद्ध धर्म तुटण्याची भीती वाटत आहे.

दुसऱ्या-तिसऱ्या धर्माचे वर्चस्व वाढण्याची शक्यता वाढली आहे. जपान-कोरियामध्ये लोक प्रेमविवाह चर्चमध्ये करणे अधिक पसंत करत आहेत. युवा वर्गाचे आकर्षण ख्रिस्ती धर्मात वाढत आहे. अशात तिथला बौद्ध धर्म धोक्यात आला आहे. असे मला माझ्या एका भिक्षू मित्राने सांगितले आहे. जो दर तीन महिन्यांनी जपानला ये-जा करत असतो.

असेही नाही की प्रेमविवाह यशस्वी होत नाहीत. अरेंज मॅरेजच्या तुलनेत प्रेमविवाहाच्या यशाचा दर खूप कमी आहे. अन्यथा कोर्टामध्ये घटस्फोटासाठी गर्दी लागली नसती.

शेवटी अशा प्रेमविवाहाच्या बाबतीत कुटुंबातील जबाबदार व्यक्ती हे सांगून आपले हात झटकून घेतात की, नशिबात जे लिहिले आहे. तेच होते. जोरू (पतनी) आणि जमीन नशिबाशिवाय मिळत नाही.

हे त्यांचे अपयश लपवण्याचे एक कारण असते. की ते आपल्या युवा होत असलेल्या मुलांना नैतिक मूल्ये शिकवण्यात अयशस्वी ठरले आहेत.

हिंदू धर्माच्या पायात जाती व्यवस्था आणि कुटुंब आहे. जिथे कुटुंब संकटात सापडले आहेत. जात-धर्माची लोकसंख्या कमी होत आहे. कुटुंब 'आम्ही दोघे' वरून 'एक' वर आले आहेत...............


यासाठी दुसऱ्या धर्माची (मुस्लिम धर्माची) संख्या वाढण्याचा दोष देणेही योग्य नाही.

ज्यांना हिंदू धर्माची काळजी आहे. त्यांना जाती अंतर्गत विवाहांना प्रोत्साहन द्यावे लागेल. जात तुटली तर समाज आणि धर्मही तुटेल. कुटुंब आपल्या युवा होत असलेल्या मुलांना विवाहाची वास्तविकता सांगण्यात चुकले आहे. नैतिक मूल्यांचे संस्कार करण्यात अयशस्वी ठरले आहे. नैतिक पतन कुटुंब आणि समाज तुटण्याचे कारण बनत आहे.

या तिन्ही माझ्या स्वतःच्या अनुभवाच्या उदाहरणांवरून तुम्हाला काय वाटते? .........कुटुंबाने आपल्या मुला-मुलींच्या प्रेमविवाहाला समर्थन द्यायला हवे की......... थोडीशी दरी ठेवायला हवी.

त्यांच्या स्वतःच्या भल्यासाठीच का होईना, जेणेकरून त्यांचे आपसात चांगले निभावेल. घटस्फोटाची वेळ येणार नाही. वाढती घटस्फोटित लोकांची संख्याही देश आणि समाजासाठी चिंतेचा विषय आहे.

# विवाहमार्गावरील आकर्षकता आणि आत्मविश्वास ! सौंदर्य सुधारणेची गरज आहे का ?



- श्रीमती मनीषा विशाल दोरसेटवार
खलासी लाईन, मोहन नगर, नागपुर
मोबाइल - 9881255809

मनुष्य स्वभावाप्रमाणे, प्रत्येकाला आपल्या आयुष्यात एक सुंदर जोडीदार हवा असतो, हे एक सामाजिक सत्य आहे. भारतीय समाजात पहिली छाप पाडण्यासाठी आणि विवाह जुळवण्याच्या प्रक्रियेत बाह्य सौंदर्याला आजही मोठे महत्त्व दिले जाते.

विवाह बाजारात मुले आणि मुली, विशेषतः मुलींच्या चेहऱ्याची ठेवण, रंग आणि शारीरिक आकर्षकता यांवरून त्यांची निवड होण्याचे प्रमाण अधिक आहे. सुंदर दिसणे हे केवळ पसंतीचा विषय नसून, ते आत्मविश्वासाचे प्रतीक बनले आहे. ऑनलाईन असो वा पारंपारिक पद्धत, नकार देण्याचा आधार बऱ्याचदा बाह्य रूप यावर असतो.

प्रत्येक व्यक्ती जन्मजात सुंदर नसते. अशावेळी, आकर्षक दिसण्यासाठी आधुनिक वैद्यकशास्त्र आणि कॉस्मेटिक सर्जरीचा वापर करणे नैतिकदृष्ट्या योग्य आहे. नाक, दात, केस किंवा त्वचेचे दोष दूर करण्यासाठी कॉस्मेटिक सर्जरीचा वापर करणे हे कोणतीही चूक नाही. सुंदर दिसणे थेट आत्मविश्वास वाढवते. दातांची समस्या दूर झाल्यास व्यक्तीच्या चेहऱ्यावर एक वेगळी चमक येते आणि सार्वजनिक ठिकाणी बोलताना आत्मविश्वास वाढतो.

हुंड्यापोटी अनावश्यक खर्च करण्यापेक्षा, तोच पैसा मुलीच्या सौंदर्य सुधारणेवर खर्च करणे अधिक व्यवहार्य आहे. हुंडा देणे हा सामाजिक आणि कायदेशीर गुन्हा आहे, तर मुलीच्या आत्मविश्वासासाठी तिच्या बाह्य सौंदर्यात सुधारणा करणे ही एक सकारात्मक गुंतवणूक ठरू शकते.

आधुनिक काळात, आकर्षक दिसणे ही एक वैयक्तिक निवड आणि आत्मविश्वासाची गुरुकिल्ली बनली आहे. बाह्य सौंदर्याच्या मागणीचे सामाजिक वास्तव जोपर्यंत कायम आहे, तोपर्यंत कॉस्मेटिक सर्जरीचा वापर करून स्वतःला अधिक आकर्षक बनवणे हे आत्म-सन्मान वाढवणारा आणि विधायक पर्याय आहे.

पालकांनी हुंड्याऐवजी आपल्या मुला-मुलींच्या आरोग्यावर आणि आत्मविश्वासावर गुंतवणूक करावी.

# लग्नाचे स्वप्न आणि शेतकरी तरुणांचे वास्तव! जिथे नाती जुळत नाहीत!



- श्री अभय श्रीहरी कट्टेवार
किन्ही गांव , पांढ़रकवडा जिला यवतमाल
लेखक एक संवेदनशील शेतकरी आंदोलनकारी आहे.
मो. 9423653001

भारत हा कृषी प्रधान देश आहे शेतकरी जगाचा पोशिंदा आहे जो एका दाण्याचे हजार दाणे करतो त्याचे आयुष्य आज एक ना अनेक संकटातुन मार्ग काढत आहे आपला पेरकी समाज बहुतांश हा शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून आहे संघर्षमय जीवन जगत आहे तो जास्तीत जास्त ग्रामीण भागामध्ये विस्तारलेला आहे ग्रामीण भागातून शेती आणि शेतमजुरीतून अर्थव्यवस्था सुधारून मुला-मुलींना शिक्षण देणे एवढं सोपं राहिलेलं नाही.

शेतकऱ्याप्रती बदललेला दृष्टिकोन आणि तुटलेली प्रतिमा शहरी आणि सुशिक्षित समाजाने शेतकऱ्याची प्रतिमा आपल्या मनात पूर्णपणे बदलून टाकली आहे. आजच्या काळात शेतकऱ्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन अनेक लोकांच्या मनात कष्ट कर्ज आणि गरिबी या पलीकडे काही दिसून येत नाही जरी चुकीचा समज असला तरी याला थोडाफार आधार ही आहे अलीकडील काळात शैक्षणिक क्षेत्रात आपल्या समाजातील मुला मुलींनी भरारी घेतली असली तरी भावी पिढी करिता संघर्ष संपलेला नाही. तसेच एकीकडे शेतीवरील संकटे त्यातूनही संघर्ष करून ग्रामीण भागातून येणाऱ्यांना स्पर्धेत टिकणे ही वाट शोधून पुढे स्पर्धेच्या युगात सरकारी आणि व्यावसायिक क्षेत्रात नोकरीची संधी मिळविणे सोपे नाही.

अशातच शहरी कुटुंबांना वाटते की शेतकरी कुटुंब आपल्या मुलीला स्थिर आणि सुखी आयुष्य देऊ शकणार नाही. लग्नानंतर शहरी सुख देऊ शकणार नाही लग्नानंतर शहराची सुख सोडून शेतात राबवी लागेल ही भीती त्यांच्या मनात बसली आहे. शहरी भागातील मुली ग्रामीण भागातील मुलांसोबत विवाह करण्याचे विषयच उरला नाही. शेतकरी कुटुंबाचा शेती क्षेत्रातील अनुभव पाहता शेतकरी कुटुंबातूनही शेतकरी कुटुंबात आपल्या मुलींना शेतकरी कुटुंबातील तरुणांसोबत लग्न करण्यासाठी तयार होत नाही. त्यांच्या मते त्यांच्या मुलीचे भविष्य कष्टमय असुरक्षित असेल या भीतीने शेतकरी कुटुंबातील तरुणाच्या आयुष्यात विवाहाच्या शक्यता मावळू लागल्या आहे.

कर्तुत्ववान स्वाभिमानी उच्चशिक्षित मुलींचे विवाहाचे निकष बदलले आहेत तिला शेतीत समोर असलेली जीवन तर नकोच आहे. तसे तिला संयुक्तिक कुटुंबातील जीवन नकोसे झाले तिला सरकारी नोकरी शहरी जीवनशैली आणि एकांतातील जीवनशैलीला प्राधान्यक्रम ही सर्वात मोठी समस्या आहे.

ज्या शेतकरी कुटुंबातून पालकांनी कष्ट करून त्यांना शिकवले त्या मुलींना शेतीत राबणारा मुलगा नको आहे. त्यांनी शेतकरी कुटुंबाचा संघर्ष उघड्या डोळयांनी पाहिला आहे तर दुसरीकडे शहरी भागातील मुलींच्या अपेक्षा अनेक आहेत त्यापैकी सर्वात महत्त्वाची समस्या तिला व तिच्या कुटुंबाला दोघात तिसरा नको आहे. हा सामाजिक असंतुलनाचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

ग्रामीण भागातील तरुणांची संख्या वाढत आहे तशीच शहरी भागातील तरुणही सुशिक्षित बेरोजगार ची संख्या आहेच हेच असंतुलन अविवाहित तरुणाची वाढती संख्या तरुणांमधील नैराश्य एकाकीपणा आणि वाढती व्यसनाधीनता वाढत आहे. हे केवळ त्याचे व्यक्तिगत दुःख नाही तर संपूर्ण समाजाला पोखरून टाकणारे कारण आहे. बदलत्या काळानुसार पूर्वी होणारे विवाह आणि आज होणारे विवाह फार मोठी तफावत दिसून येत आहे.

शहरी भागातील वातावरणात तयार झालेली तरुण पिढी ही ग्रामीण ग्रामीण भागातील उच्चशिक्षित मुलींना पसंती देत आहे आणि ग्रामीण भागातील समाज हा शेती आणि शेतमजुरीवर अवलंबून असल्याने आर्थिक बाजूने कमजोर आहेत. त्यातही काटकसर करून आर्थिक बाजूने भक्कमपणे असला तरी त्याला नोकरदार संबंधाची बरोबरी करण्याकरिता तडजोडी कराव्या लागत आहे.

पूर्वीच्या काळात चार नातेवाईक मुलींचा पाहणीचा कार्यक्रम करायचा त्याजागी आता संख्या वाढली दोन-तीन वेळा पाहण्याचा कार्यक्रम सुरू झाला. दहा-बारा नातेवाईक लोकांना घेऊन होणारा साक्षगंधाचा कार्यक्रम आज हजार बाराशे लोकांना बोलवून मोठ-मोठे सांस्कृतिक हाल करून लाखोचा खर्च करून मोठेपणाचा आव आणून केटरिंगच्या व्यवसाय करणाऱ्यांना मोठे करण्यामागे धन्यता मानत आहे. नंतर लग्न समारंभात होणारा खर्च वेगळाच.. पूर्वी लग्न समारंभ गाव खेड्यात व्हायचे तो आनंद वेगळाच असायचा त्यामध्ये नातेसंबंध जमल्या जायचे खर्चाची बचत व्हायची आपुलकीचे नाते गुंपले जायचे त्यांची जागा आज फार वेगळया स्तराला पोहोचली आहे.

नातेसंबंध तर दूरच यामध्ये मुलींकडे मंडळींना आधीच कर्जाच्या डोंगर

चढलेल्या संबंधीला पुन्हा पुना दरीत लोटल्या जात आहे. ही तफावत सामाजिक बांधिलकी जोपासणारी नसून येणाऱ्या काळातील धोक्याची सुरुवात आहे.

भविष्यकाळात हे सामाजिक असंतुलन इतके वाढू शकते की ग्रामीण भागातून सुव्यवस्था बिघडून जाईल कुटुंबाच्या आणि नात्याच्या मूलभूत गरजा पूर्ण न झाल्यास कौटुंबिक कल वाढून समाज कुटुंब स्थिर राहू शकणार नाही. या गंभीर समस्येवर मात करण्यासाठी ग्रामीण भागातील कुटुंबासोबत विवाह जुळून कौटुंबिक नाते संबंधात प्रेम जिव्हाळा उत्पन्न होण्याच्या उदांत हेतूने शेतकरी कुटुंबातून संबंध जुळविण्यासाठी वैवाहिक पद्धतीत अमुलाग्र बदल घडून आणण्यासाठी शेतकरी किंवा ग्रामीण भागातून शेतकरी असो की शेतमजूर यांच्या प्रतिष्ठेला बाधा न पोहोचवता अनेक बदल घडवून आणण्याकरिता त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे

वैवाहिक पद्धतीत बदल करणे या खर्चातून त्या कुटुंबाला किंवा त्या कुटुंबातील मुलाला त्या खर्चातून उद्योग निर्माण करण्यास प्रोत्साहन देऊन एक नवीन उद्योजक व्यवसायिक बनवण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे आणि ते कुटुंब आपल्या बरोबरीने कसे आणता येईल यासाठी प्रयत्न करायला पाहिजे.

शेतकरी कुटुंब कसा अनन्दाता उद्योजक होईल तरुण पिढीला कृषी उद्योगातील भविष्य समजावून सांगणे दोन कुटुंबाच्या माध्यमातून एक नवा उद्योग कसा उभा करता येईल ग्रामीण ग्रामीण शेतकरी बंधूला शहरी कुटुंबातील व्यक्तीचा जोड देऊन कसे मोठा उद्योगपती करता येईल यातून दोन्ही कुटुंब कसे मोठे होईल आणि यातून नवा समाज कसा उभा करता येईल यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

शहरी पेरकी समाज ग्रामीण पैकी समाज या दोघातील विषमता दूर करण्यासाठी प्रयतन्शील होऊन एकोप्याने काम करायला पाहिजे. त्यामुळे आपला समाज हा भक्कमपणे स्वतःच्या पायावर उभा होईल आणि ग्रामीण शहरी विषमता नक्कीच दूर होईल.



# पेरकी समाज ! ओळख, अस्तित्व आणि 'समाजात लग्न करा' अभियानाला प्रोत्साहन देण्याची गरज आहे

## जर आपण समाज आणि संस्कृतीचे तसेच हिंदूंचे हितचिंतक असाल, तर या विषयावर निश्चितच विचारमंथन करा

लेखक : **प्रकाश पारो गणपतराव गोविन्दवार**, नागपुर

पेरकी समाजाची वीण, तिची ओळख आणि अस्तित्व अनेक शतकांपासून सामाजिक व्यवस्थेचा आधारस्तंभ राहिले आहे. सध्याच्या काळात, जेव्हा वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक संरचना यांच्यात एक नाजूक संतुलन राखण्याची गरज आहे, तेव्हा 'समाजात लग्न करा' (समाज में शादी करो) सारखे अभियान एका महत्त्वपूर्ण चर्चेला जन्म देतात.

हे अभियान केवळ विवाहांना प्रोत्साहन देण्यापुरते मर्यादित नाही, तर पेरकी समाजाची विशिष्ट ओळख आणि सांस्कृतिक वारसा जपून ठेवण्यासाठीची ही एक जन-जागृती आहे.

**1) पेरकी समाजच्या या अभियानाचा उद्देश आणि विरोध !**

माझे हे अभियान प्रामुख्याने पेरकी समाजामध्येच विवाह संबंधांना प्रोत्साहन देण्यावर केंद्रित आहे, जेणेकरून समाजाचा पाया मजबूत राहील.

तथापि, या प्रयतनने काही लोकांमध्ये माझ्याबद्दल द्वेष आणि विरोधाची भावना निर्माण केली आहे. हा विरोध अशा लोकांकडून आहे जे आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन देतात किंवा त्याचे समर्थन करतात.

हे समजून घेणे आवश्यक आहे की, विरोध नोंदवणे हा त्यांचा संवैधानिक अधिकार आहे, अगदी तसेच जसे मला माझे विचार व्यक्त करण्याचा आणि लिहिण्याचा अधिकार संविधानाने दिला आहे.

ही विडंबना आहे की काही लोक माझ्या या सामाजिक अभियानाला वैयक्तिक विरोध म्हणून घेत आहेत. एका व्यापक सामाजिक हिताच्या मुद्द्याकडे वैयक्तिक आक्षेप म्हणून पाहणे, ही त्यांची स्वतःची कमजोरी किंवा अपयश असू शकते.

आंतरजातीय विवाह करणाऱ्या लोकांना त्यांचे स्वतःचे स्वातंत्र्य आहे. संविधान त्याला परवानगी देते, आणि हा त्यांचा वैयक्तिक निणन्य आहे. या प्रकरणात आई-वडील, समाज किंवा कोणत्याही बाहेरील व्यक्तीला हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही. ज्या व्यक्तीने आपल्या आनंदासाठी हा निणन्य घेतला आहे, त्याने त्यात आनंदी राहिले पाहिजे.

पण समाजाने आपल्याला स्टेजवर बोलावून 'तुम्ही योग्य केले' म्हणून आदर-सत्कार करावा, अशी अपेक्षा त्यांनी ठेवू नये. इथे येऊन त्यांचा वैयक्तिक निणन्य आणि स्वातंत्र्याचा मुद्दा संपतो आणि समाजकारण शुरू होतो.

**2) समाजाची यशोगाथा आणि विघटनाच्या संकटावर गंभीर चिंतन!**

याच्यापुढे 'समाज' नावाच्या एका समूहाची, 'आमच्या पेरकी समाजाची' यशोगाथा

सुरू होते. समाजाचा पाया समाज अंतर्गत विवाहांवर टिकून आहे. जोपर्यंत समाजातील विवाह समाजात होतील, तोपर्यंतच समाजाचा समूह टिकून राहील.

आंतरजातीय विवाह आपल्या पेरकी समाजाची वीण विस्कटून टाकेल आणि 'समाज' नावाची कोणतीही गोष्ट शिल्लक राहणार नाही, तेव्हा काय ?

समाज हितचिंतक आणि हिंदू हितचिंतक लोकांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी या पायाला, या नीवाला मजबूत ठेवण्याचे कार्य करावे.

सध्याच्या परिस्थितीत पेरकी समाजातील शिकलेल्या मुलींचे मोठ्या संख्येने आंतरजातीय विवाह करणे हे एक गंभीर आव्हान बनले आहे. यामुळे समाजात निश्चितच मुलींची संख्या कमी झाली आहे.

मुलींकडे मुलांना निवडण्याची 'चॉईस' (पसंती) वाढली आहे, आणि त्या कमी शिकलेल्या किंवा ग्रामीण पार्श्वभूमीच्या मुलांना नकार देत आहेत. गावातील मुलीही शहरात स्थायिक होण्याची स्वप्ने पाहत आहेत. यामुळे पेरकी समाजात अविवाहित तरुणांची संख्याही वेगाने वाढली आहे. कोणताही समाज आणि कुटुंब आपल्या मुलांना अविवाहित पाहू इच्छित नाही.

वेळेतच पेरकी समाजाने आपल्या मुलींना दुसऱ्या जाती-धर्मात विवाह करण्यापासून थांबवण्यावर आणि मुलांवर योग्य संस्कार करण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अन्यथा, आपल्या समाजातही घटस्फोटांची प्रकरणे वाढतील आणि कुटुंब विखुरले जाईल.

**3) समाधानाकडे पाऊल ! तेलुगू भाषिक समाजाची एकता आणि अखंडता वाढवण्याची गरज आहे !**

'समस्या असेल तर समाधानही निश्चितच असते. 'तेलुगू भाषी समाज' संघटनेने एक रचनात्मक उपाय शोधला आहे. या संघटनेत मनन्वार, आर्य वैश्य, शिंपी, पेरकी समाज यांसारख्या काही तेलुगू भाषिक जातींचा समावेश आहे, जे आपापसात विवाहांना प्रोत्साहन देत आहेत.

एकाच भाषा आणि संस्कृतीच्या लोकांमध्ये विवाह संबंधांना प्रोत्साहन देणे, विशेषतः पेरकी समाजात मुलींची कमतरता असताना, आंतरजातीय-धर्मीय विवाहापेक्षा कितीतरी चांगला पर्याय आहे.

हे समान भाषा, संस्कृती आणि विचारांच्या समूहांना संघटित करण्याच्या गरजेवर भर देते, जे 'रोटी-बेटी'च्या व्यवहाराने मजबूत होतील. हा 'अरेंज्ड आंतरजातीय विवाह' पेक्षा उत्तम पर्याय आहे, ज्यावर समाजाने गंभीरपणे विचारमंथन केले पाहिजे.

तीन वर्षांपूर्वी अशाच एका अखिल भारतीय तेलुगू भाषी समाज संघटनेत सम्मेलनात पेरकी समाजाचे माजी अध्यक्ष श्री भगवान नारदेलवारजी यांना आमंत्रित करण्यात आले होते. या संघटनेचे सचिव माझे मित्र होते.

थोडक्यात, हे अभियान पेरकी समाजाचे अस्तित्व आणि ओळख वाचवण्यासाठी, त्याचा पाया मजबूत करण्याचा एक प्रयत्न आहे. आपल्याला वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामूहिक हित यांच्यात संतुलन साधत, आपल्या समाजाचा पाया सुरक्षित ठेवण्याच्या दिशेने सकारात्मक पाऊल उचलावे लागेल.

# हिंदू धर्मात विवाह (गृहस्थाश्रम) का आहे अनिवार्य ? सनातन वैदिक मूल्यांचे प्रबोधन !




- श्री ईश्वर महाराज मासटवार,
वांजरी गांव ,पांढरकवडा, यवतमाल
मोबाइल - 95271 78764


**विवाहाचे महत्त्व : केवळ दोन व्यक्तींचे मिलन नाही, तर धर्म आणि कर्तव्यपूर्ती आहे!**

हिंदू धर्मात विवाह हे केवळ दोन व्यक्तींचे सामाजिक किंवा भावनिक बंधन नसून, ते एक पवित्र संस्कार आणि नैतिक कर्तव्य मानले जाते. हिंदू जीवनशैलीत संन्यासी किंवा साधू वगळता, प्रत्येक व्यक्तीसाठी विवाह ही जवळजवळ अनिवार्य अट आहे. यामागील मूळ कारण हे सनातन वैदिक धर्माच्या चार आश्रमांच्या (ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम, संन्यासाश्रम) संकल्पनेत दडलेले आहे.

गृहस्थाश्रम हा सर्व आश्रमांमध्ये सर्वश्रेष्ठ मानला गेला आहे, कारण याच आश्रमात राहून व्यक्ती धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांची सिद्धी करू शकते.

**पौराणिक मान्यता आणि धार्मिक ग्रंथांनुसार विवाहाची अनिवार्यता !**

धार्मिक ग्रंथांनी विवाहाचे महत्त्व स्पष्ट करताना, ते वैयक्तिक सुखाऐवजी 'कर्तव्य' म्हणून अधिक पाहिले आहे !

1) **तीन ऋणांची (कर्जांची) पूर्ती**

सनातन धर्मात, प्रत्येक व्यक्ती जन्मतः तीन ऋणांसह (कर्ज) येते :

- **देव ऋण** : देवतांच्या कृपेमुळे प्राप्त झालेल्या जीवनाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे, जे यज्ञाद्वारे पूर्ण होते.
- **ऋषी ऋण** : ज्ञानी ऋषीमुनींकडून मिळालेल्या ज्ञानाचे ऋण, जे अध्ययन व अध्यापनाने पूर्ण होते.

● **पितृ ऋण :** पूर्वजांचे ऋण, जे संतानोत्पत्ती (वंशवृद्धी) आणि त्यांचे योग्य पालनपोषण करून, म्हणजेच गृहस्थाश्रमात प्रवेश करूनच पूर्ण होते.

यातील पितृ ऋण फेडल्याशिवाय व्यक्ती मोक्षास पात्र होत नाही, अशी श्रद्धा आहे. यासाठी विवाह आणि अपत्यप्राप्ती अनिवार्य ठरते.

**2. धर्म-कार्यांसाठी सहचारिणीची गरज**

वैदिक परंपरेनुसार, कोणताही मोठा धार्मिक विधी (यज्ञ) एकट्या पुरुषाला पूर्ण करता येत नाही. पत्नीला 'अर्धांगिनी' म्हटले जाते, कारण ती पतीच्या धर्म-कार्यांचा 'अर्धा भाग' पूर्ण करते. म्हणूनच, यज्ञाच्या वेळी पत्नीचे आसन पतीच्या उजव्या बाजूला अनिवार्य असते.

**3. संततीद्वारे 'मोक्ष' प्राप्ती**

हिंदू धर्मानुसार, मृत्यूनंतर आत्म्याला 'पुननमक' नरकात जावे लागू नये म्हणून पुत्र किंवा संतती आवश्यक असते. संतती ही केवळ वंशाची साखळी पुढे नेत नाही, तर ती पूर्वजांसाठी तर्पण, श्राद्ध आणि पिंडदान करून त्यांना सद्गती प्राप्त करून देण्यास मदत करते.

**गृहस्थाश्रम :** समाजाचा आधारस्तंभ आणि नैतिक जबाबदारी !

गृहस्थाश्रम हा केवळ एका कुटुंबाचा आधार नसून, तो संपूर्ण समाजव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे !

● **उत्पादन आणि पोषण :** गृहस्थाश्रमी व्यक्तीच अर्थाजन करते. याच आश्रमातून पैसा, अन्न आणि संसाधने निर्माण होतात, ज्यावर ब्रह्मचारी (शिक्षण घेणारे विद्यार्थी), वानप्रस्थी (वृद्ध) आणि संन्यासी (साधू) यांचे जीवन अवलंबून असते. म्हणूनच, त्याला 'पोषक' आश्रम म्हटले जाते.

● **चार पुरुषार्थांची सिद्धी :** धर्म (कर्तव्याचे पालन), अर्थ (पैसा कमावणे), काम (इच्छांची पूर्ती) आणि मोक्ष (अंतिम मुक्ती) हे चारही पुरुषार्थ गृहस्थाश्रमात राहून संतुलित पद्धतीने अनुभवता येतात. येथे 'काम' (इच्छा) म्हणजे केवळ उपभोग नसून, कुटुंब निर्मिती आणि कर्तव्यपूर्तीचे सुख आहे.

● **संस्कारांचे जतन :** गृहस्थाश्रमातच मुलांना संस्कार दिले जातात. भावी पिढीला धर्म, नीती आणि मूल्यांची शिकवण देऊन त्यांना सुजाण नागरिक बनवण्याचे कार्य याच आश्रमातून होते. अशा प्रकारे, गृहस्थाश्रम हा संस्कृती आणि परंपरेचे जतन करतो.

# विवाह : प्रेम आणि विश्वासाचा मजबूत पाया आहे !



- श्री. राम अरुण अक्कलवार
कृष्णा टाउनशिप, वसई (प.), मुंबई - 401202
मो. 9152074967

**विवाह : प्रेम आणि विश्वासाचा मजबूत पाया आहे !**

विवाह ही केवळ एक सामाजिक किंवा धार्मिक प्रथा नाही, तर दोन व्यक्तींमधील प्रेम आणि विश्वासावर आधारलेले एक सुंदर बंधन आहे. हे दोन महत्त्वाचे स्तंभ आहेत, जे कोणत्याही यशस्वी आणि आनंदी वैवाहिक जीवनाचा पाया आहेत.

प्रेम हे विवाहातील प्रत्येक नात्याला जिवंत ठेवते. ते केवळ रोमँटिक भावनांपुरते मर्यादित नाही, तर त्यात आदर, सहानुभूती आणि एकमेकांची काळजी घेणे यांचा समावेश असतो.

- **आदर आणि स्वीकृती** : प्रेम आपल्याला आपल्या जोडीदाराचा आदर करायला शिकवते. हे गुण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला, मतांना आणि स्वपनंना स्वीकारण्याचे सामर्थ्य देतात.
- **सहानुभूती** : प्रेम आपल्याला आपल्या जोडीदाराच्या सुख-दुःखामध्ये सहभागी होण्यास शिकवते, ज्यामुळे त्यांना भावनिक आधार मिळतो.
- **एकमेकांना प्रोत्साहन** : प्रेम आपल्याला एकमेकांच्या यशाचा आनंद साजरा करण्यास आणि आव्हानांमध्ये एकमेकांना प्रोत्साहन देण्यास शिकवते.

प्रेम हे कितीही महत्त्वाचे असले तरी, विश्वासाशिवाय ते टिकू शकत नाही. विश्वास हा नात्यातील सुरक्षा आणि स्थिरता सुनिश्चित करतो.

- **प्रामाणिकपणा** : विश्वास निर्माण करण्यासाठी प्रामाणिकपणा आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत एकमेकांशी खोटे न बोलणे हा विश्वासाचा पाया आहे.
- **पारदर्शकता** : आपल्या जोडीदारापासून कोणतीही गोष्ट लपवू नये. आर्थिक बाबींपासून ते व्यक्तिगत भावनांपर्यंत प्रत्येक गोष्टीत पारदर्शकता असणे महत्त्वाचे आहे.
- **वचनबद्धता** : दिलेली वचने पाळणे आणि एकमेकांप्रती वचनबद्ध राहणे, हे विश्वास मजबूत करते.
- **सुरक्षिततेची भावना** : जेव्हा दोन व्यक्ती एकमेकांवर विश्वास ठेवतात, तेव्हा त्यांना

सुरक्षित वाटते. यामुळे त्यांना आपले विचार आणि भावना मोकळेपणाने व्यक्त करण्याची संधी मिळते.

कोणतेही नातेसंबंध समस्यांपासून मुक्त नसतात, आणि विवाहही त्याला अपवाद नाही. मात्र, या समस्यांवर योग्य प्रकारे मात केल्यास नातेसंबंध अधिक मजबूत होतात.

**सामान्य समस्या आणि त्यांचे उपाय !**

● **संवादाचा अभाव :** अनेक समस्यांचे मूळ कारण संवादाचा अभाव असतो.

● **उपाय :** एकमेकांसाठी वेळ काढा, मनमोकळेपणाने संवाद साधा आणि एकमेकांचे म्हणणे ऐकून घ्या.

● **आर्थिक समस्या :** आर्थिक तणाव विवाहात कलह निर्माण करू शकतो.

● **उपाय :** एकत्र बसून बजेट तयार करा, खर्चाचे नियोजन करा आणि भविष्यासाठी एकत्र बचत करा.

● **सांस्कृतिक आणि कौटुंबिक फरक :** वेगवेगळ्या कुटुंबांमधून आल्यामुळे विचारांमध्ये आणि सवयींमध्ये फरक असू शकतो.

● **उपाय :** एकमेकांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा आदर करा, जुळवून घेण्याचा प्रयतन करा आणि दोन्ही कुटुंबांना समान महत्त्व द्या.

● **रोजच्या जीवनातील तणाव :** कामाचा ताण, मुलांचे संगोपन, आणि इतर जबाबदाऱ्यांमुळे तणाव निर्माण होऊ शकतो.

● **उपाय :** एकमेकांना मदत करा, जबाबदाऱ्या वाटून घ्या आणि एकत्र वेळ घालवण्यासाठी काही मनोरंजक गोष्टी करा.

**विवाह दोन व्यक्तींना एकत्र आणतो, पण तो दोन कुटुंबांनाही जोडतो.**

● **जबाबदाऱ्या :** विवाहानंतर कुटुंबातील दोन्ही सदस्यांची भूमिका बदलत जाते. त्यांना आपल्या जोडीदाराच्या कुटुंबाचा भाग बनणे शिकायला लागते आणि त्यांच्यासोबत नवीन नातेसंबंध निर्माण करावे लागतात.

● **समन्वय :** दोन्ही कुटुंबांमध्ये चांगला समन्वय राखणे महत्त्वाचे आहे. दोन्ही कुटुंबांतील सदस्यांशी संवाद साधा आणि त्यांचे प्रेम मिळवा.

# घटस्फोटाच्या परिस्थितीत स्त्री आणि पुरुषांचे अधिकार आणि न्यायालयांची भूमिका !



- ॲडव्होकेट महेश दिगांबरराव गोविंदवार
एल एल एम
यवतमाल, मोबाइल - 91-7972877894

**हिंदू कोड बिलनुसार घटस्फोटातील अधिकार, कर्तव्ये आणि मालमत्ता वाटप**

हिंदू कोड बिल (Hindu Code Bill) किंवा भारतीय कायद्यानुसार, संबंध विच्छेद (घटस्फोट) प्रकरणात पुरुष आणि स्त्रीचे अधिकार, कर्तव्ये आणि मालमत्तेच्या वाटपाबद्दलची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे !

**घटस्फोटाचे अधिकार (तलाक)**

- हिंदू विवाह अधिनियम, 1955 (Hindu Marriage Act, 1955) अंतर्गत, पुरुष आणि महिला दोघांनाही घटस्फोटाचा अर्ज करण्याचा अधिकार आहे.
- घटस्फोटाच्या प्रमुख कारणांमध्ये परित्याग (सोडून देणे), दुसऱ्या धर्मात धर्मांतर, पतनीशिवाय अन्य स्त्रीशी संबंध ठेवणे/रखेल बनणे, असाध्य (ठीक न होणारा) रोग किंवा मानसिक अस्वस्थता इत्यादींचा समावेश होतो.

**मालमत्ता वाटपाचे अधिकार**

- हिंदू उत्तराधिकार अधिनियम, 1956 (Hindu Succession Act, 1956) नुसार, मुलींना वडिलांच्या मालमत्तेत मुलांएवढाच समान हिस्सा मिळण्याची तरतूद आहे.
- विधवा पत्नी, मुलगी आणि विधवा सून यांनाही मुलाप्रमाणेच वारसा हक्क मिळतो.
- स्त्रीधनामध्ये (विवाहित स्त्रीला मिळालेली मालमत्ता/भेटवस्तू) मुलगा आणि मुलगी दोघांनाही समान अधिकार असतो.

**कर्तव्ये आणि अधिकार**

- पती आणि पतनी दोघांवरही एकमेकांप्रति विश्वास आणि आधार देण्याचे कर्तव्य बंधनकारक आहे.
- पत्नीला पतीपासून वेगळे झाल्यावर पोटगी (रखरखाव शुल्क) मिळण्याचा अधिकार आहे, जी पतीचे उत्पन्न आणि त्यावेळेसच्या परिस्थितीवर अवलंबून असते.
- घटस्फोटाच्या प्रकरणात, दोन्ही पक्षांना आपल्या निणऱ्यानुसार कायदेशीर कार्यवाही

पुढे नेण्याचा अधिकार असतो.

**महत्त्वाच्या तरतुदी**

● हिंदू कोड बिलमध्ये बहुविवाहावर (एकापेक्षा जास्त लग्न) प्रतिबंध लावण्यात आला आहे आणि एकल विवाहाचे (Single Marriage) समर्थन केले आहे.

● आंतरजातीय विवाहांना (Inter-caste Marriage) कायदेशीर मान्यता देण्यात आली आहे आणि अशा विवाहांमधून जन्मलेल्या मुला-मुलींना वडिलांच्या मालमत्तेत समान अधिकार मिळतो.

● महिलांना त्यांच्या वडिलांच्या मालमत्तेत मुलांच्या बरोबरीने अधिकार देण्यात आला आहे, ज्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

**घटस्फोटाच्या प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाची कालमर्यादा**

भारतीय न्यायालयांमध्ये घटस्फोटाच्या प्रकरणांचा अंतिम निणऱ्य देण्यासाठी कोणतीही निश्चित वेळेची मर्यादा ठरवलेली नाही. परंतु, काही प्रक्रियांसाठी निश्चित कालमर्यादा ठरवण्यात आल्या आहेत.

**उदाहरणार्थ :**

● लिखित जबाब दाखल करण्याची कालमर्यादाः समन्स मिळाल्यानंतर 30 दिवसांच्या आत लिखित जबाब (Written Statement) दाखल करणे आवश्यक आहे. योग्य कारण असल्यास, न्यायालय ही मुदत लेखी नोंदवून 90 दिवसांपर्यंत वाढवू शकते. जास्तीत जास्त कालमर्यादा 120 दिवस आहे.

● निकाल सुनावण्याची कालमर्यादाः सुनावणी पूर्ण झाल्यानंतर, निकाल (Decision) सुनावण्यासाठी साधारणपणे 30 दिवसांची वेळमर्यादा असते, जी आवश्यक परिस्थितीत 60 दिवसांपर्यंत वाढवली जाऊ शकते.

● अपील दाखल करण्याची कालमर्यादाः घटस्फोटाच्या निकालावर अपील दाखल करण्याची मुदत सामान्यतः 30 ते 90 दिवसांदरम्यान असते, जी विशिष्ट परिस्थितीनुसार बदलते.

हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की ही कालमर्यादा विशिष्ट प्रकरणे आणि परिस्थितीनुसार बदलते आणि न्यायालय आपल्या विवेक अधिकाराचा (Discretion) वापर करून ही मुदत वाढवू शकते किंवा इतर निणऱ्य घेऊ शकते.

## कै. श्रीमती नागम्मा आजी नारायणराव लिंगलवार

|| मनी होता साधेपणा | कधीही नाही दाखविला मोठेपणा | चंदनापरी देह झिजविला ||
|| कष्टातुन वसंत फुलविला | तरली नाही साथ आम्हाला | आठवण येते क्षणा क्षणाला ||



**कै. श्रीमती नागम्मा आजी नारायणराव लिंगलवार**

[illegible]

[illegible]
आपुलकी, स्नेह, माया, ममतेची ज्या ज्या वेळी चर्चा होईल, त्या त्या वेळी सर्वात पहिली आठवण तुमची येईल...

### कै. श्रीमती नागम्मा आजी नारायणराव लिंगलवार सहज परिचय

[illegible]

[illegible]







[illegible]



Serenic beauty situated near Maharashtra-MP border, spread over a vast area of 400 acres
MAHARAJA FARMS
AGRO TOURISM
SPECIAL FEATURES:
Birthday Parties
Kitty Parties
Marraige
School Picnic
Conference Meets
College Parties
Office Parties
LET'S GO
ADVENTURE
CONTACT US
7030953133, 9373825096
Prop. Suresh Burewar
Just 49-km from zero miles, Chhindwara road, Kelwad, Tah-Saoner, Dist- Nagpur